# ११. बाली बेट

भाग–३

**पु. ल. देशपांडे** (१९१९–२०००) : प्रसिद्ध विनोदी लेखक व नाटककार. ‘नस्ती उठाठेव’, ‘बटाट्याची चाळ’, ‘गोळाबेरीज’, ‘असा मी असा मी’, ‘फसवणूक’ इत्यादी विनोदी पुस्तके; ‘अंमलदार’, ‘भाग्यवान’, ‘तुझे आहे तुजपाशी’, ‘सुंदर मी होणार’, ‘ती फुलराणी’ इत्यादी नाटके; ‘व्यक्ती आणि वल्ली’ हे व्यक्तिचित्रण; ‘अपूर्वाई’ आणि ‘पूर्वरंग’ ही प्रवासवर्णने प्रसिद्ध.

प्रस्तुत पाठात लेखकांनी इंडोनेशियामधील बाली बेट व तेथील निसर्गसृष्टी यांचे नयनरम्य वर्णन केले आहे.

**तुम्हांला काय वाटते?**

- एखाद्या ठिकाणी सहलीला जाण्यापूर्वी कोणकोणत्या गोष्टींची पूर्वतयारी करणे आवश्यक असते, असे तुम्हांला वाटते? त्या सर्व गोष्टींची यादी तयार करा.

इंडोनेशिया हा समुद्रात रत्नजडित कंठा फेकून द्यावा, तसा एक पाचूच्या बेटांचा पुंजका आहे; पण बाली मात्र ह्या कंठ्यातील कंठमणी. इंडोनेशियातल्या बेटांच्या समूहात बाली बेट एखाद्या ठिपक्यासारखेच, आपल्या गोव्याएवढे आणि गोव्यासारखेच.



आपल्या नृत्य–गायन–शिल्प–चित्र अशा विविध ललितकलांचा रंगीबेरंगी गोफ विणणारे. ह्या बेटात भारतीय संस्कृतीचे केवळ अवशेष आहेत असे म्हणणे, हा ह्या बेटांचा अपमान आहे. लक्ष मोती उधळून मातीत चूर होऊन जावे आणि एखादा मोती कुठेतरी दूर पडून तसाच अभंग राहावा, असे हे बाली बेट आहे.

जकार्ताहून रात्री अकराच्या सुमारास बालीला जाणाऱ्या विमानातून निघालो आणि मध्यरात्री बालीमधल्या देनपसार गावच्या चिमुकल्या विमानतळावर उतरलो. बाली हा टुरिस्टांचा स्वर्ग, त्यामुळे इथले टुरिस्टखाते अतिशय तत्पर आहे. मी कोण आहे, हे कळल्यावर तिथला एक तरुण अधिकारी म्हणाला, ‘‘तुम्हां उभयतांचे अधिक मन:पूर्वक स्वागत!’’

मध्यरात्रीची वेळ. किर्र जंगलातून आमची मोटार समोरचा वळणदार रस्ता काटत निघाली होती. भोवती माडांच्या राया. मधूनच झापांची छपरे असलेला झोपड्यांचा पुंजका मोटारीच्या दिव्यांच्या प्रकाशात दिसून नाहीसा होई. माझ्या शेजारी बसलेल्या अमेरिकन म्हातारीने तेवढ्यात ‘हौ वंडऽफुल्!’ म्हणायला सुरुवात केली होती. एखाद्या रहस्यमय कादंबरीच्या पहिल्या पानातून जावे तसे सुमारे तास, दीडतास त्या किर्र झाडीतून वाट काढत आमची मोटार सागर बीच हॉटेलच्या टुमदार बंगलीपुढे आली आणि तिथल्या तरुण बाली सुंदरीने आमचे स्वागत केले. रात्रीचा दीड–दोनचा सुमार असेल; पण ती तरुणी आणि स्वागत विभागातले ते चपल तरुण चेहऱ्यावर जागरणाचा यत्किंचितही ताण न दाखवता स्वागत करत होते. ह्या बेटात घड्याळ नावाची गोष्ट नाही, हे लगेच लक्षात आले. त्यांनी आम्हां प्रवाशांच्या नेमलेल्या खोल्या दाखवून दिल्या. पाच मिनिटांतच बाली बेटाने माझे घोरणे ऐकायला सुरुवात केली.

पहाटे लवकर जाग आली. बाहेरच्या ओटीवर येऊन पाहातो तो दारात समुद्र! त्या अंधूक प्रकाशात कोळ्यांच्या चिमुकल्या होड्या मासेमारीला निघाल्या होत्या. ओटीपुढच्या अंगणात मी फिरायला सुरुवात



केली. फक्त देवळातला पहाटेचा चौघडा वाजत नव्हता, एरवी थेट गोवे. मी जनाची किंवा मनाची पर्वा न करता मुक्त आवाजात गायला सुरुवात केली— 'प्रियेऽ पहा! रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल हाऽऽ!' अण्णा किर्लोस्करांनी गुर्लहोसूरच्या आसपास असलीच एखादी पहाट फुटताना पाहूनच ते गाणे लिहिले असावे. एखाद्या रम्य नाटकाची नांदी सुरू व्हावी तशी ती पहाट होती. पहाटेला स्वप्नांची परिसमाप्ती होते म्हणतात; पण बाली बेटातल्या त्या पहाटेने एका स्वप्नाची नांदी सुरू केली आणि चांगला आठवडाभर मी त्या बालीतल्या स्वप्नसृष्टीत वावरत होतो. असा सुंदर प्रदेश आणि इतकी अश्राप माणसे पुन्हा कधी पाहायला मिळणार?

इंडोनेशियावर डचांनी राज्य केले; पण बालीला मात्र कोणी बदलू शकले नाहीत. कुणी म्हणतात, डचांनी बालीचा म्यूझिअम पीस केला. ह्या बेटाचे प्रदर्शन मांडले. त्यांच्या चित्रविचित्र चाली तशाच ठेवल्या. टुरिस्टांचे आकर्षण कायम राहावे म्हणून असेलही कदाचित; पण जे आहे ते रम्य आहे, मनोहर आहे, निष्पाप आहे; पण 'आहे' म्हणताना जीभ चाचरते, कारण सुधारलेल्या दुनियेकडून येणारे वारे बाली बेटावरूनही वाहू लागले आहेत. डोक्यावर विमाने घरघरायला लागली आहेत. रेडिओने त्यांना उरल्या जगाशी जखडले आहे. एखादा तंबूतला सिनेमाही फिरत असेल, शिवाय वर्तमानपत्रेही आहेतच.

हॉटेलातल्या त्या बगिचातून मी आणि माझी पत्नी नाटकातल्या बगिचाच्या प्रवेशातून हिंडल्यासारखे हिंडत होतो. समुद्रकिनाऱ्याच्या इतक्या जवळ, इतका गर्द बगिचा क्वचित पाहायला मिळतो. माडापोफळींच्या राया असतात; पण माड आणि पोफळींखेरीज इतर इतकी झाडे होती, की काही वेळाने आम्ही त्या झाडांकडे पाहत नसून ती झाडेच 'ही कोण मंडळी आली आहेत' म्हणून आमच्याकडे पाहताहेत की काय, असे मला वाटायला लागले. मला अज्ञात असलेल्या फुलांनी बहरलेली ती रोपटी! एखाद्या शिशुवर्गात शिरल्यावर तो वर्ग जसा काहीशा भीतीने नि काहीशा गमतीने नव्या पाहुण्यांकडे पाहतो, तशी ती फुले आमच्याकडे पाहत होती. आम्ही पुढे सरकल्यावर त्यांनी एकमेकांकडे मिस्कीलपणाने डोळेही मिचकावले असतील. ती फुलबाग त्या भल्या पहाटे अगदी टवटवीत जागी होती. वेलींचेही अंगधुणे झाले होते. वृद्ध वृक्षांचा समुदाय तेवढा अजून झोपेतल्या डुलक्या देत होता. काही जागी, काही झोपलेली अशी त्या सागर बीच हॉटेलातील ती बाग एखाद्या मुलांमाणसांनी, लेकीसुनांनी भरलेल्या नांदत्या गाजत्या एकत्र कुटुंबासारखी वाटत होती. उणीव होती ती पहाटेचे मंगल पाठ म्हणणाऱ्या सृष्टीच्या गाणाऱ्या भाटांची! बाली बेटात जर मला कुठे शोधून सापडले नसतील तर ते पक्षी. इतक्या सुंदर बेटावर पाखरे का नसावीत? त्या भाटांची उणीव मी माझ्या गाण्याने भरून काढत होतो. कदाचित त्या स्वरांनीच भयभीत होऊन तो पक्षिगण बेट सोडून त्या दिवशी बेपत्ता झाला असल्यास न कळे! शापसंभ्रमातल्या पुंडरिकासारखा 'मजवरि तरु कुसुमरेणु वरुनि ढाळिती–' म्हणत म्हणत माझ्या सहधर्मचारिणीसमवेत मी त्या बागेतून हिंडलो. बाली बेटावरच्या त्या पहाटवाऱ्याने आम्हांला पुरते झपाटले होते. पहाटेचे एकच सुंदर स्वप्न दोघांनाही एकदम पडले होते.

***



**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) बाली बेटावरील विविध ललितकला

(आ)

| बेटाचे वर्णन करण्यासाठी लेखकांनी वापरलेले शब्द | बाली बेटावरील कलांसाठी लेखकांनी वापरलेले शब्द |
|---|---|
| | |

**प्र. २. खालील कल्पना स्पष्ट करा.**


(अ) बाली बेट म्हणजे रत्नजडित कंठ्यातील कंठमणी आहे.

(आ) बाली हा टुरिस्टांचा स्वर्ग आहे.

(इ) ह्या बेटावर घड्याळ नावाची गोष्ट नाही.

(ई) बाली बेटावरील बाग एकत्र कुटुंबासारखी वाटत होती.

**प्र. ३. खालील मुद्द्यांच्या आधारे बाली बेटाची माहिती लिहा.**




**प्र. ४. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) पहाटेला स्वप्नांची परिसमाप्ती होते म्हणतात.

(आ) पाच मिनिटांतच बाली बेटाने माझे घोरणे ऐकायला सुरुवात केली.

(इ) वेलींचेही अंगधुणे झाले होते.

(ई) त्या भाटांची उणीव मी माझ्या गाण्याने भरून काढत होतो.



**विचार करा. सांगा.**

- बाली बेटावर पक्षी का नसतील?
- आज शहरात चिमण्या का दिसत नाहीत?

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचा अर्थ समजून घ्या.**

(अ) टुरिस्टांचा स्वर्ग. (इ) अश्राप माणसे. (उ) तंबूतला सिनेमा.
(आ) किर्र जंगल. (ई) गाणारे भाट. (ऊ) झोपेतल्या डुलक्या.

**(आ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन भिन्न अर्थ लिहा.**

(अ) अभंग– (आ) बोट–

**(इ) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) उभयता (२) यत्किंचितही (३) चौघडा (४) चित्रविचित्र

**उपक्रम :**

पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेली पुस्तके मिळवा. वाचा.

## शोध घेऊया.




**(अ) आंतरजालाच्या साहाय्याने आशिया खंडाचा नकाशा पाहा. आशिया खंडातील कोणकोणत्या देशांना समुद्रकिनारा लाभला आहे व त्या समुद्रांत कोणती बेटे आहेत याचे निरीक्षण करा व त्याची नोंद करा.**

| देश | लाभलेला समुद्रकिनारा | तेथील बेटे |
|---|---|---|
| | | |

**(आ) आंतरजालाच्या साहाय्याने अंदमान–निकोबार या बेटांची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे मिळवा.**

(१) तेथील आदिवासी (३) निसर्गसौंदर्य
(२) आदिवासींचे जीवनमान (४) तेथील सोईसुविधा

- **प्रेक्षणीय स्थळाच्या संदर्भात खाली काही मुद्दे दिले आहेत. त्यांच्या आधारे तुम्ही भेट दिलेल्या एखाद्या प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन लिहा.**



## माहिती मिळवूया.






- **वरील जाहिरात वाचा. त्याआधारे खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) सहलीचे आयोजक कोण आहेत ?

(२) सहलीची वैशिष्ट्ये कोणती ?

(३) सहलीला जाण्यासाठी नोंदणी करणाऱ्याला सवलत का दिली असावी, असे तुम्हांला वाटते ?

(४) प्रस्तुत जाहिरात विश्वसनीय आहे, असे तुम्हांला वाटते का ? जाहिरातीतील कोणती गोष्ट तुम्हांला अविश्वसनीय वाटते ?

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**



शाब्बास ! चांगले काम केलेस बाळा !



अरेरे ! फार वाईट झाले !



बापरे ! केवढा मोठा साप !



अहाहा ! पिसारा फुलवलेला मोर !

वरील वाक्यांतील शाबास, अरेरे, बापरे, अहाहा ही **केवलप्रयोगी अव्यये** आहेत. या शब्दांना **उद्‌गारवाचक शब्द** असेही म्हणतात. वा, आहा, अहाहा, अरेरे, अबब, बापरे, ठीक, अंहं, छे ही काही केवलप्रयोगी अव्यये आहेत. तुम्हांला आणखी काही सुचतात का पाहा आणि लिहून काढा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना केवलप्रयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

• खालील चित्रांचे निरीक्षण करा. चित्रांतील व्यक्ती कोणत्या चुका करत आहेत, त्या चुकांचा परिणाम काय होऊ शकतो, यांवर गटात चर्चा करा. चर्चेतील मुद्द्यांचे वर्गात गटनिहाय सादरीकरण करा.



वाहतुकीचे नियम पाळा,
रस्त्यांवरचे अपघात टाळा.



असा प्रवास धोकादायक,
जिवावर बेतल्यास हानिकारक.



वाहनांची क्षमता जाणून घ्या,
सुरक्षित प्रवासाची हमी घ्या.



हसा, खेळा, पण शिस्त पाळा,
रस्त्यावर खेळण्याचा मोह टाळा.

• खालील पाट्यांवर वाहतूक सुरक्षिततेच्या संदर्भात घोषवाक्ये तयार करून लिहा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध सामाजिक समस्यांच्या संदर्भातील चित्रांचा संग्रह करण्यास सांगावे. अशी संग्रहित चित्रे विद्यार्थ्यांच्या गटागटांत देऊन त्यावर चर्चा घडवून आणावी. चर्चेनंतर गटनिहाय सादरीकरण करून घ्यावे.

# १२. सलाम-नमस्ते !

**सुधा मूर्ती** (१९५०) : प्रसिद्ध लेखिका. 'वाइज अँड अदरवाइज', 'सामान्यांतले असामान्य', 'अस्तित्व', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'गोष्टी माणसांच्या' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. प्रस्तुत पाठ 'पुण्यभूमी भारत' या कथासंग्रहातून घेतला आहे. सुधा मूर्ती यांच्या मूळ इंग्रजी कथासंग्रहाचा मराठी अनुवाद लीना सोहोनी यांनी केला आहे.

अत्यंत गरीब परिस्थिती असूनही माणुसकी, प्रामाणिकपणा, कष्टाळूवृत्ती, दुसऱ्यांच्या दुःखांविषयीची जाणीव इत्यादी गुण शेख महंमद व त्याची मृत्यूच्या दारात उभी असलेली बहीण झुबेदा यांच्या ठायी दिसून येतात.

प्रस्तुत पाठात लेखिकेने याचे अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन केले आहे.

शेख महंमदचं एक छोटंसं दुकान होतं. तो वह्यांची किरकोळीनं विक्री करायचा. दरवर्षी जून महिन्यात मी त्याच्याकडून मोठ्या संख्येनं वह्या विकत घेत असे. आम्ही त्या झोपडपट्टीतील शाळकरी मुलांमध्ये वाटत असू. त्याचं दुकान आमच्या ऑफिसच्या जवळच होतं. दुकानाची जागा भाड्याची होती. शेख महंमद फार संकोची स्वभावाचा होता. तो वह्या आणून आमच्याकडे पोहोचवायचा. आमचा चेक तयार झाला, की आम्ही त्याला तसं कळवायचो. मग तो येऊन चेक घेऊन जायचा.

एकदा असाच तो आमच्या ऑफिसात आला होता. त्या वेळी आम्ही सर्वजण मिठाई खात होतो. मी शेखच्या हातावर मिठाई ठेवली; पण त्यानं ती खाल्ली नाही.

''का रे शेख? तुला मधुमेहाचं दुखणं वगैरे आहे का?''

''नाही मॅडम. खाऊ घरी न्यावा म्हटलं. घरात लहान मुलं आहेत. माझ्यापेक्षा त्यांनाच याची गोडी जास्त.''

''तुला किती मुलं आहेत?'' मी विचारलं. ती तेवढीशी मिठाई घरी जाऊन पुरली असती की नाही, कोणास ठाऊक !

''मॅडम, मला एक मुलगी आहे. शिवाय माझी भाचीपण माझ्याकडेच असते.''

''का बरं? तुझी भाची तुझ्याकडे का असते?''

''माझी बहीण झुबेदा विधवा आहे आणि ती आमच्याकडेच राहते.''

मला ते ऐकून शेखबद्दल वाईट वाटलं. तो एक छोटा दुकानदार होता. तो काही खूप कमवत नव्हता, त्यामुळे त्याच्या कुटुंबाविषयी आणखी माहिती काढावीशी मला वाटली.

''झुबेदा काय करते?''

''ती उत्तम शिवणकाम करते. ती आणि माझी बायको अशा दोघीजणी मिळून घरी शिवणाचा व्यवसाय करतात. अल्लाची मेहेरबानी आहे. आमचं छोटंसं भाड्याचं घर आहे. आम्ही समाधानी आहोत.''

त्याचं ते उत्तर माझ्या हृदयाला स्पर्श करून गेलं. आजकालच्या जगात 'समाधान' हा शब्द तसा दुर्मिळच झाला आहे.

असेच काही महिने लोटले आणि एक दिवस शेखचा मला फोन आला, ''मॅडम, या खेपेला मला तुम्ही चेक ॲडव्हान्समध्ये देऊ शकाल का?''

''का बरं शेख? काही खास कारण?''

''होय मॅडम. झुबेदाला कॅन्सर झालाय. उद्या तिचं ऑपरेशन आहे.''

मी ताबडतोब ऑफिसात निरोप ठेवून चेक त्याच्या घरी लगेच पाठवून दिला; पण त्याच्याबद्दल मनात

**माहिती मिळवा.**

- तुमच्या परिसरातील गरजू, अनाथ, अपंग इत्यादी व्यक्तींसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांविषयी माहिती मिळवा.

विचार येऊन मन उदास झालं. त्या ऑपरेशनचा खर्च भरपूर येणार होता, ती रक्कम जमा करण्यासाठी शेखची नक्कीच खूप धावपळ चालू असणार; पण तरीही त्यानं माझ्याकडे पैसे मागितले नव्हते.

अनुभवानं मला बरंच काही शिकवलंय. आपल्या स्वत:च्या हिऱ्याच्या कुड्या पर्समध्ये लपवून गोरगरिबांसाठी निधी गोळा करायला आलेल्या बायका मी पाहिल्या आहेत. आपल्या मुलांना शिष्यवृत्ती मिळावी, म्हणून ती मुलं अनाथ असल्याचं सांगताना, चांगल्या सधन कुटुंबातल्या आई-वडिलांना मी पाहिलंय. कितीतरी माणसं फाउंडेशनकडून मदत पदरात पाडून घेण्यासाठी आपल्या आईला निराधार ठरवून मोकळी होतात, हेही मी पाहिलंय. जर एखाद्या व्यक्तीला मदत मिळाली नाही, तर ती व्यक्ती आयुष्यातून उठेल असं आम्हांला ज्या कुणाबद्दल वाटेल, त्यालाच फाउंडेशन मदत करेल, असा माझा नेहमी आग्रह असतो.

मी शेखला फोन केला. ''शेख, मला एक सांग, या ऑपरेशनच्या पैशांची काय व्यवस्था केली आहेस तू?''

''मॅडम, मी झुबेदाचे आणि माझ्या बायकोचे सगळे दागिने विकले आहेत. शिवाय बँकेकडूनही थोडं कर्ज घेतलं आहे.''

''शेख, तू आम्हांला का नाही मदतीसाठी विचारलंस?''

''मॅडम, मला निदान एवढं तरी परवडतंय; पण आणखी कित्येक लोक आमच्याहूनही गरीब असतात. माझ्यापेक्षा त्यांना तुमच्या मदतीची जास्त गरज आहे.''

त्याचं ते उत्तर ऐकून मन हेलावलं. जास्त काही न बोलता मी त्याला दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलची सर्व कागदपत्रं घेऊन येण्यास सांगितलं. मी त्याला पुढे काही बोलायची संधीच दिली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी सगळी कागदपत्रं घेऊन तो ऑफिसात आला. मी त्याला थोडा वेळ थांबायला सांगितलं. सगळी कागदपत्रं नीट तपासून पाहिली आणि नंतर त्याला पन्नास हजारांचा चेक लिहून दिला. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य होतं. ''मॅडम, तुमच्याकडून एवढे पैसे मिळतील असं मला वाटलंच नव्हतं. तुम्ही माझ्या संकटात आपलं माणूस समजून मदतीला धावून आला आहात.''

हे असलं बोलणं मी सहसा फारसं मनावर घेत नाही. जेव्हा कधी मी गरजूंना मदत करते तेव्हा ते मला असं काहीतरी म्हणतातच; पण एकदा त्यांची गरज भागली, संकटातून मुक्तता झाली, की ते बोलण्याचेही कष्ट घेत नाहीत. असेच काही दिवस लोटले. ऑपरेशन व्यवस्थित पार पडल्याचा निरोप शेखनं आमच्या ऑफिसात ठेवला होता. त्यानंतर बरेच दिवस त्याच्याकडून काहीच बातमी कळली नाही. आमचंही त्याच्याकडे काही काम निघालं नव्हतं.

एक दिवस सकाळच्या वेळी मी ऑफिसात पाऊल टाकलं आणि रिसेप्शन काउंटरपाशी शेख थांबलेला मला दिसला. त्याच्याबरोबर चार वर्षांची छोटी मुलगीपण होती. तिच्या अंगात साधाच सुती फ्रॉक होता; पण झालरी, बटणं वगैरे लावून सुरेख शिवलेला होता. तिच्या केसांना भरपूर तेल लावून चापूनचोपून एक पोनीटेल बांधली होती.

शेखचा चेहरा दु:खी दिसत होता.

''काय शेख? कसा आहेस तू? तुला भेटीची वेळ वगैरे दिली होती की काय?''

''सॉरी मॅडम, दोन आठवड्यांपूर्वीच झुबेदा गेली. तुम्ही तिला इतकी मदत केली; पण तिचं नशीबच खोटं. खरंतर तुम्हांला येऊन भेटायची, तुम्हांला सलाम करायची इच्छा होती हो तिची; पण अल्लानं तिला नेलं. मी तिच्या मुलीला घेऊन आलोय. ही तबस्सुम.''

मी तबस्सुमकडे पाहिलं. हे एवढं मोठं ऑफिस... ही सभोवताली एवढी सगळी अनोळखी माणसं... बिचारी बावरली होती.

त्या अनाथ मुलीकडे पाहून मला वाईट वाटलं. आपल्या नशिबात काय वाढून ठेवलंय, याची तिला कल्पनाही नव्हती. तिच्या मामानं तिला सांगितलं, ''बेटी, मॅडमको सलाम करो!'' त्याबरोबर त्या पोरीनं आपले इवलेसे हात उचलून मला सलाम केला.

माझ्या तोंडून शब्द फुटेना.

शेखनं डाव्या हाताच्या बोटांनी डोळे पुसले आणि खिशातून एक पाकीट काढलं. ''मॅडम, हे तुमच्यासाठी आहे. झुबेदानं पाठवलंय. मला यायला उशीर झाला त्याबद्दल सॉरी हं.''



मी तो लिफाफा उघडला. आत तीन हजार रुपये होते. मी गोंधळून शेखकडे पाहिलं. ''मॅडम, तुम्ही पन्नास हजार दिले होते; पण झुबेदाचं ऑपरेशन आणि औषधपाण्यासाठी फक्त सत्तेचाळीस हजारच खर्च आला. आपण आता यातून काही वाचत नाही हे जेव्हा झुबेदाला समजलं, तेव्हा ती म्हणाली, 'आपण उरलेले पैसे मॅडमना परत करू. निदान दुसऱ्या कुणाच्यातरी उपयोगाला येतील. एखादा नशीबवान असेल, त्याचा जीवतरी वाचेल. आता हे पैसे माझ्यावर खर्च करून वाया घालवायला नकोत आपण.' ''

माझ्या नकळत माझ्या डोळ्यांतलं पाणी गालावरून वाहू लागलं. मी झुबेदाला कधीच भेटले नव्हते; पण दुसऱ्यांविषयीची तिच्या मनातली ही कळकळ पाहून मी थक्क झाले.

इतक्या गरिबीत आणि यातना सहन करतानासुद्धा तिनं दुसऱ्या गरजू रुग्णांचा विचार करावा, ही गोष्ट विस्मयचकित करून सोडणारी होती. आपण स्वत: संकटाशी झुंज देत असताना दुसऱ्याचा विचार करणारी माणसं या जगात विरळच ! इथे तुमचं शिक्षण, भाषा, जातपात, धर्म या कशाकशाचा संबंध नसतो. त्यासाठी हृदयात अपार करुणा असावी लागते.

मी तो लिफाफा तसाच शेखला परत देऊन म्हणाले, ''हे पैसे तबस्सुमसाठी आहेत. अल्लाची तिच्यावर मेहेरबानी असू दे. तिला नीट शिकू दे. तुला जर काही मदत लागली, तर प्लीज मला सांग. इतरांविषयी करुणेची भावना बाळगण्याच्या बाबतीत ती आपल्या आईच्याही चार पावलं पुढे जाऊ दे. आपली ही जी भूमी आहे ना, ती श्रीमंत का आहे, माहीत आहे? सोन्याच्या किंवा हिऱ्याच्या खाणी तिच्या पोटात आहेत, म्हणून नव्हे. या झुबेदासारख्या लोकांमुळेच तिचं ऐश्वर्य वाढणार आहे.''

तबस्सुम नुसती तिथे बसली होती. तिला काहीच कळत नव्हतं. माझे शब्द पचनी पडणं शेखलाही कठीण जात होतं.

***

https://en.wikipedia.org/wiki/Sudha_Murthy

## स्वाध्याय



**प्र. १. खालील वाक्यांमधून पाठातील त्या त्या व्यक्तीचा दिसणारा गुण लिहा.**

(अ) लेखिका झोपडपट्‌टीतील शाळकरी मुलांमध्ये वह्या वाटत.

(आ) माझ्यापेक्षा त्यांनाच याची गोडी जास्त.

(इ) ''मॅडम, माझ्यापेक्षा गरीब लोकांना तुमच्या मदतीची जास्त गरज आहे.''

(ई) ''मॅडम, तुम्हांला सलाम करण्याची झुबेदाची इच्छा होती.''

(उ) त्या अनाथ मुलीकडे बघून मला वाईट वाटलं.

**प्र. २. स्वभाववैशिष्ट्ये लिहा.**

झुबेदाचा भाऊ–
शेख महंमद याची स्वभाववैशिष्ट्ये

**प्र. ३. शेख महंमदमार्फत झुबेदाने उरलेले पैसे लेखिकेला परत केले, ही घटना तुम्हांला काय शिकवते?**

**प्र. ४. लेखिकेची तबस्सुमविषयीची भावना तुमच्या शब्दांत सांगा.**

## खेळूया शब्दांशी.

- **खालील इंग्रजी शब्दांसाठी वापरले जाणारे मराठी भाषेतील शब्द लिहा.**

(१) ऑफिस–　　(३) हॉस्पिटल–　　(५) ऑपरेशन–

(२) चेक–　　(४) ॲडव्हान्स–　　(६) कॅन्सर–



## विचार करा. सांगा.

- **या पाठातील कोणत्या व्यक्तिरेखा तुम्हांला आवडल्या व त्या का आवडल्या याबद्दल तुमचे मत सांगा.**
- **या पाठातून मिळणारा संदेश तुमच्या शब्दांत सांगा.**

## माहिती मिळवूया.



- **गरजू रुग्णांना मदत करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था आहेत, त्याविषयी आंतरजालावरून माहिती मिळवा.**
- **खालील स्वभाववैशिष्ट्ये असलेल्या तुमच्या परिसरातील व्यक्तींची नावे लिहा.**

(गप्पिष्ट, लाजाळू, रागीट, शांत, हजरजबाबी.)

- **खालील चित्रे पाहून आपल्या भावना व्यक्त करणारी वाक्ये लिहा.**





- **खालील वाक्यांत योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहा.**

(अ) .............. काय सुंदर आहे ताजमहाल !

(आ) .............. तो असे म्हणालाच नाही !

(इ) .............. किती जोरात ठेच लागली !

(ई) .............. किती उंच आहे ही इमारत !

## वाचा.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून आशयानुसार परिच्छेद तयार करा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.**

वर्गातील मुलांना बाई सांगत होत्या, ''आपलं बोलणं, वागणं, आवडीनिवडी, स्वभाव, विचार, सवयी एवढंच नव्हे, तर आपली प्रकृती, आरोग्य, बुद्धिमत्ता या सर्व गोष्टींचा परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. आपल्याला अवांतर वाचन करायला, मैदानावर खेळायला आवडत असेल, मित्रांची संगत, सोबत भावत असेल, तर या सर्व गोष्टी आपलं व्यक्तिमत्त्व फुलवण्यात साहाय्यक ठरतात. घरातल्या वातावरणाचा, संस्कारांचा परिणाम आपल्या वर्तनावर, स्वभावावर, विचारांवर व आपल्या भाषेवर होत असतो. ज्या घरात मुलांच्या विचारांना, मतांना, प्रश्न विचारण्याला स्वातंत्र्य दिलं जातं, त्या घरातील मुलं स्वतंत्र विचारांची व ठाम व्यक्तिमत्त्वाची होतात. त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव असते. याउलट काही मुलं फार आक्रमक असतात. 'मी म्हणेन तेच खरं' अशी वागणारी असतात. अशी मुलं इतरांच्या भावनांची कदर करत नाहीत. त्यांच्या वागण्यात बेजबाबदारपणा, बेफिकीर वृत्ती जाणवते. ती कायम ढेपाळलेली, अरसिक, रूक्ष व निरुत्साही, घाबरलेली, चिंतित असतात. अशी मुलं कुणाचे चांगले मित्र बनू शकत नाहीत व मनमोकळेपणानं वावरू शकत नाहीत. तुम्हांला तुमचं व्यक्तिमत्त्व कसं घडवायचं आहे, हे केवळ तुमच्या हातात आहे. स्वत:ला फुलवायचं, अष्टपैलू बनवायचं, की अरसिक, बेजबाबदार बनवायचं; स्वत:चे विचार व्यक्त करायला शिकायचं, की दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी प्यायचं; दिलखुलास जगायचं की रडतखडत, घाबरत घाबरत जगायचं, तुम्हीच ठरवा, स्वत:ला कसं घडवायचं.''

# १३. अनाम वीरा...

• ऐका. वाचा. म्हणा.

अनाम वीरा जिथे जाहला तुझा जीवनान्त
स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात !


धगधगतां समराच्या ज्वाला या देशाकाशीं
जळावयास्तव संसारातुन उठोनिया जाशी !

मूकपणाने तमी लोपती संध्येच्या रेषा —
मरणामध्ये विलीन होसी, ना भय ना आशा !

जनभक्तीचे तुझ्यावरी नच उधाणले भाव
रियासतीवर नसे नोंदले कुणी तुझे नाव !

जरी न गातिल भाट डफावर तुशें यशोगान !
सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान !

काळोखातुनि विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्युंजय वीरा !



**कुसुमाग्रज** –विष्णू वामन शिरवाडकर (१९१२-१९९९) : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'समिधा', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'मारवा', किनारा' इत्यादी काव्यसंग्रह; 'वैजयंती', 'राजमुकुट', 'कौंतेय', 'नटसम्राट', 'वीज म्हणाली धरतीला', 'विदूषक' इत्यादी नाटके प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवीने देशाच्या सीमेवर शत्रूशी लढणाऱ्या, वेळप्रसंगी प्राणार्पण करून देशाचे रक्षण करणाऱ्या ज्ञात-अज्ञात सैनिकांना अभिवादन केले आहे.



**प्र. १. कवींनी असे का म्हटले असावे, असे तुम्हांला वाटते?**

(अ) स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात !
(आ) जळावयास्तव संसारातुन उठोनिया जाशी !
(इ) सफल जाहले तुझेच हे रे, तुझेच बलिदान !

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

**देशासाठी प्राणार्पण केलेला सैनिक 'अनाम' राहिला आहे, असे कवींना वाटते, त्याची कारणे लिहा.**

→
→
→
→
→

**प्र. ३. खालील जोड्या जुळवा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
| --- | --- |
| (१) धगधगतां समराच्या ज्वाला | (अ) शांतपणे मरण स्वीकारणे |
| (२) मरणामध्ये विलीन | (आ) निर्भयपणे, मनात कोणतीही आसक्ती न ठेवता |
| (३) ना भय ना आशा | (इ) भावना व्यक्त न करणे |
| (४) नच उधाणले भाव | (ई) महाभयंकर युद्ध |

**प्र. ४. खालील शब्दांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) अनाम वीरा–
(२) जीवनान्त–
(३) संध्येच्या रेषा–
(४) मृत्युंजय वीर–



## लिहिते होऊया.

- **तुम्ही कोण होणार, ते ठरवा. त्यासंबंधित खाली काही प्रश्न दिले आहेत, त्यांवर विचार करा. त्या प्रश्नांची उत्तरे तयार करून त्यांचे सलग लेखन करा.**

**मी.......... होणार!**

- मी...... व्हायचे का ठरवले आहे?
- मी...... होण्याबाबत माझ्या कुटुंबातील सदस्यांची काय मते आहेत?
- ......होण्यासाठी मी काय प्रयत्न करणार आहे?
- मी ...... बनल्यानंतर भविष्यात काय काय करणार आहे?

## म्हणी ओळखूया.

- **खालील वाक्ये वाचा. वाक्याच्या अर्थानुसार योग्य म्हण लिहा.**

(१) गणपतरावांकडे जोपर्यंत प्रतिष्ठेचे पद होते, धनसंपत्ती होती, तोपर्यंत त्यांच्याकडे येणाऱ्या पैपाहुण्यांचा राबता होता. जसे ते सेवानिवृत्त झाले, तसा माणसांचा वावर कमी झाला आहे, म्हणतात ना.......

(२) रेहानाची कंपासपेटी हरवली, तिने ती घरभर शोधली. शेजारीपाजारीही जाऊन पाहिले; पण कंपासपेटी कोठेच नव्हती. शेवटी ती रेहानाच्याच दप्तरातच सापडली, म्हणतात ना.......

(३) पावसात भिजणाऱ्या कावळ्याने ठरवले, पावसाळा संपला, की घर बांधायचे. पावसाळा संपला, पण इकडे तिकडे फिरण्यात तो विसरून गेला. पुन्हा पावसाळा आला. पावसात भिजताना त्याला आठवले, की आपण घर बांधायचे ठरवले होते, म्हणतात ना.......

(४) फर्नांडिस खूप बुद्धिमान व प्रसंगावधानी म्हणून प्रख्यात होते. त्यांचा मुलगा फिलिप जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे त्याच्यात हे गुण दिसू लागले. गावातले सगळे म्हणू लागले,.......



## वाचा.

- **खालील उतारा वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहा.**

मुलांनो शाळेत तुम्हांला अनेक मित्र असतात तुमची काळजी घेणारे तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत कोण बरे आहेत हे मित्र असा प्रश्न तुम्हांला निश्चितच पडेल आपल्याला फळे फुले सावली देणारे वृक्ष आपल्याला पिण्यासाठी पाणी देणाऱ्या नद्या श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे

## आपण समजून घेऊया.

- **वाक्य म्हणजे काय?**

संपूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला **वाक्य** म्हणतात. वाक्याचे दोन भाग असतात. ज्याच्याविषयी सांगायचे ते **उद्देश्य** आणि जे सांगायचे ते म्हणजे **विधेय**.

'त्याचा मोठा मुलगा दररोज आगगाडीने मुंबईला जातो.'

या वाक्यात मुलाविषयी सांगायचे आहे, म्हणून 'मुलगा' हे उद्देश्य, तर 'जातो' हे विधेय आहे. या वाक्यातील 'त्याचा', 'मोठा' हे शब्द उद्देश्याचा विस्तार आहेत, तर 'दररोज', 'आगगाडीने' हे शब्द विधेयाचा विस्तार आहेत.

काही छोटी वाक्ये तयार करून त्यांतील उद्देश्य, विधेय ओळखा आणि त्यांचा विस्तार करता येतो का ते पाहा.

## हे करून पाहूया.

प्रत्येकाच्या अंगी काही कलाकौशल्ये असतात. त्या कलाकौशल्यांतून नवनिर्मिती होत असते. या कलाकौशल्यांतून आपल्याला आपले विचार व्यक्त करता येतात. असे विचार, कल्पना आपणांस चित्रांच्या साहाय्यानेही प्रकट करता येतात. चला पाहूया, ही अनोखी चित्रकला!





प्रत्येकाला चित्र काढायला आवडतं. जे काढावंसं वाटतं, ते रेखाटणं म्हणजे चित्र. चित्र दुसऱ्याला दाखवण्यासाठी असतं, असं मुळीच नाही. चित्र काढायचं ते आपल्या आनंदासाठी. अशी चित्रांची मौज अनुभवायची असेल, तर एक छानसा मार्ग म्हणजे भिंतीवरची चित्रं.

कागदावरचं चित्र हातांची बोटं आणि मनगट वापरून काढावं लागतं. कागदावरील चित्राचा आकार लहान असतो, त्यामुळे आकारबद्ध रेखाटन येणं हे एक कौशल्य आहे. ते सर्वांनाच प्राप्त होतं असं नाही; पण भिंतीवरच्या चित्राचं तसं नाही. भिंतीवरच्या चित्रासाठी खांद्यापासून हात हलवावा लागतो. त्यासाठी चित्र रेखाटण्याचं कौशल्य यायलाच पाहिजे, असं काही नाही, फक्त त्यासाठी चित्र रेखाटणाऱ्या गटाचं पूर्ण नियोजन पाहिजे.

भिंतीवरचं चित्र कसं काढायचं? अगदी सोपं आहे. एखादं सोपं चित्र निवडायचं. त्यात रंग कोणते भरायचे, त्या रंगांचं मिश्रण कसं तयार करायचं ते निश्चित करायचं. उदा., आपण भिंतीवर झाडं, पानं, फुलं, डोंगर, पक्षी, सूर्य असं निसर्गचित्र काढायचं ठरवलं, तर आधी पार्श्वभूमी रंगवून घ्यायची. नंतर संपूर्ण भिंतीला फिकट रंग द्यायचा. झाडाचा आकार काढून घ्यायचा. प्रत्येक चित्राची जागा ठरवून घ्यायची. मग त्या रंगवलेल्या भिंतीवर ठरवलेल्या चित्राच्या बाह्यरेषा काढायच्या. त्यात रंग भरायचे. रंगकाम करताना गडद, विरोधी रंग वापरायचे म्हणजे चित्र आकर्षक दिसतं. सगळ्यांत शेवटी चित्रातील बारकावे रंगवायचे.

## लिहिते होऊया.

- **तुम्हांला काय करायला आवडते ते सांगा. त्यासंबंधी खाली काही प्रश्न दिले आहेत. त्यांवर विचार करा व लिहा.**

  (अ) तुमचा आवडता छंद कोणता? त्यासाठी तुम्ही दिवसभरात किती वेळ देता?

  (आ) तुमच्या आवडत्या छंदाबाबत तुमच्या घरातील व्यक्ती तुम्हांला कोणती मदत करतात?

# १४. कवितेची ओळख

**शारदा दराडे** (१९७९) : विविध वृत्तपत्रे व मासिकांतून लेखन. 'गाडग्यातील अमृतवाणी' या काव्यसंग्रहात काही कवितांचे लेखन. सदर पाठ्यपुस्तकासाठी महाराष्ट्रातील शिक्षकांकडून मागवण्यात आलेल्या एकांकिकांतून प्रस्तुत एकांकिकेची निवड करण्यात आली आहे. लेखिका जि. प. प्रा. शाळा, पिंपळगाव चिलमखा केंद्र मेहुनाराजा, ता. देऊळगांव राजा, जि. बुलडाणा येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

सुधीरला शाळेत 'काव्यप्रतिभा' या विषयावर आधारित एक प्रकल्प शिक्षिका देतात. सुधीरचा हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्याच्या घरातील सर्वजण कवितेतून संभाषण करतात. लेखिकेने या काव्यरूपी संभाषणातील गंमतजंमत प्रस्तुत एकांकिकेतून मांडली आहे.

(शाळा सुटते. सुधीर घरी येतो, पण तो कुणाशीच बोलत नाही. विचारांत गुंतलेला असतो.)

**आजोबा :** अरे! सुधीर केव्हा आलास? आजचा प्रवेश असा शांत कसा?

**सुधीर :** आजोबा, काव्यप्रतिभा वाढवा, म्हणजे काय हो?

**आजोबा :** कोणी सांगितलं रे तुला हे?

**सुधीर :** आज शाळेत बाईंनी आम्हांला 'काव्य प्रतिभा वाढवण्यासाठी तुम्ही केलेले प्रयत्न' हा प्रकल्प दिलाय. मला तर ताणच आलाय.

**आजी :** अरे, फार सोपं आहे ते! कविता करण्याची, समजून घेण्याची आपली आकलनशक्ती वाढवणं, म्हणजे काव्यप्रतिभा वाढवणं. त्यासाठी तू प्रयत्न करायचे आहेस, हेच सांगितलंय बाईंनी.

**सुधीर :** पण मी हे कसं करू?

**आजोबा :** अरे, काळजी नको करूस. यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करू, म्हणजे तुझी काव्यप्रतिभाही वाढेल आणि कविता करणं, कवितेचं आकलन होणं म्हणजे काय हेही तुला समजेल.

### तुमचा अनुभव सांगा.

- प्रकल्प म्हणजे काय?
- या पूर्वी शाळेत दिलेल्या प्रकल्पांपैकी तुम्हांला कोणता प्रकल्प सर्वांत जास्त करायला आवडला? का ते लिहा.
- प्रकल्प पूर्ण करताना तुम्ही अनुभवलेला अविस्मरणीय अनुभव थोडक्यात सांगा.

**आजी :** तुम्ही हो काय प्रयत्न करणार?

**आजोबा :** आपण आजपासून कवितेत संभाषण करायचं. ते तो कागदावर उतरून घेईल, म्हणजे त्याला कविताही समजेल अन् त्याचा प्रकल्पही पूर्ण होईल.

**आई :** सुधीर हातपाय धू अन् दूध घे.

**सुधीर :** आजी मी कागद अन् वही घेतो. आताच आपण सुरुवात करू.

(आजी दिवा लावते व मोठ्याने 'शुभंकरोती' म्हणते.)

**आजी :** घरामध्ये लावते सांजवात,<br>भाजी करते आता कांद्याची पात.



**आजोबा :** आता म्हाताऱ्याचा वाढतो वात,
नको भाजी करू तू कांद्याची पात.

**आजी :** कधीतरी कशाला म्हणतील का हो ?
मी सांगितलेल्या भाजीला नेहमीच देतात खो.

**सुधीर :** ए माझी सुपर आजी,
तुला आवडेल ती कर भाजी.

**आजोबा :** तू बनव भाजी छान छान चवळी,
ए सुधीर, आण रे इकडे दातांची कवळी !

**आजी :** बरं बाई, तुमची इच्छा हाच ध्यास,
भाजी बनवते चवळीची खास.

(सगळेजण खो-खो हसतात. बाबांची रात्रपाळी असते.)

**बाबा :** अगं आई, अगं आई,
पटकन खायला दे ना गं काही.
मला ऑफिसला जाण्याची घाई,
नाहीतर बॉस करू देणार नाही सही.

**सुधीर :** कसली घाई, कसली सही,
आजीनं दिली चपाती नि दही.

**आई :** काय बाई कवितेची कमाल,
बोलतात नि हसतात तोंडावर धरून रुमाल.

**आजी :** आता सोड रे घराचा पाश,
ऑफिसात जा आता सावकाश.

(बाबा ऑफिसला जातात. आजोबा फिरायला निघतात.)

**आजोबा :** मला द्या काठी नि चप्पल,
कोटाचं जोडून द्या तुटलेलं बक्कल.

**आजी :** तुम्हांला तर समजतच नाही,
तोडून ठेवता काही ना काही.

**आई :** आई, तुम्ही बाबांवर चिडू नका,
रागाचा तुम्ही सोडा हेका.

**आजी :** म्हणे रागाचा सोडा हेका,
कामाचा का मी घेतलाय ठेका ?
शिवणकाम शिकलीस, पण
बक्कल लावायला चुकलीस.

**आई :** चिडता का हो माझ्यावर ?
माया करावी सर्वांवर.

**सुधीर :** तुम्ही आता नका भांडू,
भांडण ऐकून येतंय रडू.
लहान तोंडी मोठा घास,
करपलेल्या भाजीचा सुटलाय वास.

(सुधीर रुसतो. तेवढ्यात ताई येते. तिला हे वातावरण नवीन असते. विषय समजताच खो-खो हसते, पण आनंदित होते व सहभागी होते.)

**ताई :** बरं का आजोबा अन् आजी,
दूर करू सुधीरची नाराजी.
कवितेत मारेल तो बाजी.
आई, आहे का घरात पिठाची सोजी ?

**आई :** सोजी तुला हवी तरी कशाला ?
लाडू खातेस अन् बशी ठेवतेस उशाला.

**सुधीर :** चला सगळे जेवण करू,
चवळीच्या भाजीवर ताव मारू.

(सगळेजण एकत्रित मिळून जेवण करतात.)

**आजी :** रात्र झाली आता झोपा,
उघडू सकाळी कवितेचा खोपा.

(सर्वजण झोपतात. सकाळी उठल्यावर सुधीरला सर्वजण कामात दिसतात. सुधीर आईकडे जातो.)

**आई :** सूर्य उगवला, चिमण्या उडाल्या,
सगळ्यांच्या अंघोळी झाल्या.
हवा सुटली आहे गार गार,
अंघोळीचे पाणी केले गरम फार.

**ताई :** (सुधीरला) अंघोळ कर पटकन,
नाष्टा कर चटकन.
झालाय उशीर तुला,
झटपट आवर मुला.

**आजी :** आजोबांना द्या स्वेटर, मफलर,
आणा कानटोपी,
थंडीपासून बचावाची हीच युक्ती सोपी.

(सुधीर अंघोळ करून आवरून येतो.)

**ताई :** सुधीर तू लिहून घे नीट,
यमक जुळायला हवे फिट.
शब्दांचे यमक हवेत नीट,
तरच बनते कविता धीट.

(बाबा रात्रपाळीहून परत येतात. कालचा विषय त्यांच्या लक्षात येतो. ते गालातल्या गालात हसतात. खुर्चीवर रेलून बसतात.)

**बाबा** : कामाचा आलाय आता कंटाळा,
दया थोडे पाणी टाकून वाळा.
(आई कणीक मळत असते.)
कणीक तुम्ही नंतर मळा,
अगोदर शिऱ्यासाठी रवा चाळा.

**आई** : तोंड धुवा, अंघोळ करा, खा गरम शिरा,
मग सुधीरच्या डब्यासाठी बटाटे तुम्ही चिरा.

**आजी** : सुधीर आवर दप्तर ठीक,
नाहीतर कचऱ्याचे येईल त्यात पीक,
टापटीपपणा दररोज शीक.

**सुधीर** : आजी, आई खूप छान,
मला नाही कशाचीच वाण.
तुमच्यावाचून हलेना पान.

(आजोबा होकार दर्शवतात. तेवढ्यात बाबा काही पुस्तके सुधीरच्या हातात देतात.)


**बाबा** : बस झाला कवितांचा पाऊस,
अशाने थोडीच पूर्ण होणार हौस !
(पुस्तके देत)
हा घे थोरांच्या कवितांचा मळा,
वाचून लागेल तुला कवितांचा लळा.

(सुधीर कवितांची पुस्तके वाचतो. त्यात तल्लीन होऊन जातो. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान घरातील सर्वांना दिसते.)

**सुधीर** : बाबा, आई, ताई, आजोबा अन् आजी
अस झालंय वाचू किती ?
कविता अंगणात उतरल्या अति,
त्या मी वेचू कशा अन् किती ?
शांताबाईंची बाग अन् सुर्वेंची गिरणी,
गदिमांचे घर अन् बालकवींची फुलराणी.
चेतवले भावनांचे मोहोळ तुम्ही मनी.

(सर्वजण टाळ्या वाजवतात व सुधीरचे अभिनंदन करतात. तो प्रसन्नतेने प्रकल्प लिहून शाळेत बाईंकडे सादर करतो.)

***



## स्वाध्याय



**प्र. १. खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) आजीने काव्यप्रतिभा वाढवण्याचा सांगितलेला अर्थ.

(आ) सुधीरची काव्यप्रतिभा वाढवण्यासाठी कुटुंबाने केलेली मदत.

(इ) बाबांनी सुधीरला कवितांची पुस्तके आणून देण्याचे कारण.

(ई) कुटुंबातील सदस्यांनी सुधीरचे अभिनंदन करण्याचे कारण.

**प्र. २. पाठातील ‘कवितेतून बोलण्याची गंमत’ तुमच्या शब्दांत मांडा.**

**प्र. ३. या पाठातील आशयाच्या आधारे तुमच्या शब्दांत एक छानशी कथा तयार करून लिहा.**

**प्र. ४. ‘आम्ही चित्र काढतो’ या विषयावर तुम्ही व तुमचे वर्गमित्र यांच्यातील संवाद कवितेच्या माध्यमातून सादर करा.**

**प्र. ५. पाठातील कोणता काव्यसंवाद तुम्हांला सर्वाधिक आवडला, ते सकारण सांगा.**

प्र. ६. खालील आकृती पूर्ण करा.

पाठात आलेल्या साहित्यिकांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |



## चर्चा करूया.


- तुम्हांला कविता करायला आवडत असल्यास तुम्ही त्यासाठी कोणते प्रयत्न कराल?
- तुम्ही 'काव्यवाचना'चा कार्यक्रम ऐकला असल्यास तो तुम्हांला कसा वाटला, याबाबत मित्रांशी चर्चा करा.

## खेळूया शब्दांशी.

- खालील वाक्प्रचारांचा अर्थ चौकटीतून शोधून लिहा.

(अ) खो देणे.
(आ) पाश सोडणे.
(इ) हेका धरणे.
(ई) भावनांचे मोहोळ चेतवणे.

नकार देणे.
बंधनातून मुक्त होणे.     हट्ट करणे.
भावना जागृत करणे.



## खेळ खेळूया.

(अ) खालील कंसात काही म्हणी दिलेल्या आहेत. दिलेल्या वाक्यांशी संबंधित म्हण ओळखा व लिहा.

(अति तिथे माती, आगीतून उठून फुपाट्यात पडणे, पळसाला पाने तीनच, नावडतीचे मीठ अळणी, थेंबेथेंबे तळे साचे, कामापुरता मामा, गर्वाचे घर खाली)

(अ) फुशारकी मारणाऱ्याचा पराजय होतो.

(आ) एखाद्याकडून काम करून घेताना गोड बोलायचे आणि काम झाले, की त्याला सोडून द्यायचे.

(इ) सर्वत्र परिस्थिती समान असणे.

(ई) थोडे थोडे जमवून मोठा संचय करणे.

(उ) एका संकटातून बचावणे व दुसऱ्या संकटात सापडणे.

(ऊ) कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो.

(ए) न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती पसंत पडत नाही.

**(आ) खाली काही वाक्ये दिली आहेत. त्यामध्ये एकच शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला आहे. खालील वाक्ये वाचा त्यातील ठळकपणे दाखवलेल्या शब्दांचे अर्थ समजून घ्या. तुम्हीही याप्रमाणे वाक्ये तयार करण्याचा प्रयत्न करा.**

(१) आमचे मराठीचे **सर** इतके छान शिकवायचे, की अन्य शिक्षकांना त्यांची **सर** येत नसे.
(२) सकाळचा चहा मला **कपात** काठोकाठ भरलेला लागतो. त्यात **कपात** केलेली मला चालत नाही.
(३) एकदा एका शिक्षकांचा मला दूरध्वनी आला.
दूरध्वनीवर ते मला म्हणाले, ''सर, आपण आमच्या शाळेला **भेट** द्या.'' मी त्यांना विचारले, ''काय **भेट** देऊ?'' ते शिक्षक म्हणाले, ''ते शाळेला **भेट** दिल्यानंतर ठरवा.''



## विचार करा. सांगा.

- **तुम्ही दरवर्षी अनेक प्रकल्प करत असाल. यावर्षी तुम्ही पूर्ण केलेला प्रकल्प कोणता व तो कसा पूर्ण केला, त्या सर्व कृती क्रमवार लिहून त्यांचा ओघतक्ता बनवा.**

## आपण समजून घेऊया.

- **वाक्य म्हणजे काय, हे आपण अभ्यासले आहे. वाक्यांचे विविध प्रकार आहेत. त्यातील काही वाक्य प्रकारांची माहिती आपण करून घेणार आहोत.**

### (१) विधानार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.
(अ) माझे घर दवाखान्याजवळ आहे.
(आ) तो रोज व्यायाम करत नाही.
या प्रकारच्या वाक्यांत केवळ विधान केलेले असते.

### (२) प्रश्नार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.
(अ) तुला लाडू आवडतो का?
(आ) तुम्ही सकाळी कधी उठता?
या प्रकारच्या वाक्यांत प्रश्न विचारलेला असतो.

### (३) उद्‌गारार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.
(अ) अरेरे ! फार वाईट झाले.
(आ) शाबास ! चांगले काम केलेस.
या प्रकारच्या वाक्यांत भावनेचा उद्‌गार काढलेला असतो.

### (४) आज्ञार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.
(अ) मुलांनो, रांगेत चला.
(आ) उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.
या प्रकारच्या वाक्यांत आज्ञा किंवा आदेश असतो.

- **वर दिलेल्या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वाक्यांचे प्रकार समजावून सांगावेत. विविध उदाहरणे देऊन वाक्य प्रकार ओळखण्यास सांगावे. अधिकाधिक सराव करून घ्यावा.


## कविता करूया.

● पाठामधील सुधीरचा प्रकल्प तुम्ही पूर्ण झालेला पाहिला. सगळ्यांच्या मदतीने त्याने कविता तयार करण्याचा प्रयत्न केला. शेवट समान असणारे शब्द त्याने शोधले. फक्त शेवट समान असणारे शब्द वापरणे म्हणजे कविता करणे नव्हे. त्यासाठी ज्या विषयावर कविता करायची तो विषय समजून घेऊन त्या विषयाशी संबंधित गोष्टींचा विचार करता यायला हवा. त्यासाठी खाली दिलेले संकल्पना चित्र अभ्यासा.


आपल्याला छंद या विषयावर कविता करायची असेल, तर त्या छंदाशी संबंधित काही गोष्टी माहीत असणे आवश्यक आहे.
आकृती क्र.१ चे निरीक्षण करा.

आता त्या छंदाशी संबंधित एक घटक निवडून त्या अनुषंगाने इतर शब्दांचा शोध घ्या.
आकृती क्र.२ चे निरीक्षण करा.

१




२





अभिनय करणे माझा छंद,
जोपासतात सारे आप्तवृंद.

यशस्वी होण्यास करतो निरीक्षण,
नेहमीच घेतो पारंगतांचे मार्गदर्शन.

आकृती क्र.२ मधील पुरस्कार हा शब्द घेतला, तर त्या अनुषंगाने इतर शब्दांचा शोध घ्या.
आकृती क्र.३ चे निरीक्षण करा.

३




आस आहे सदैव पुरस्काराची,
टाळ्या, कौतुक आणि सत्काराची.

वरील शब्दांना गुंफून आपल्याला छोटी छोटी अर्थपूर्ण वाक्ये तयार करता येतात. तसेच शेवटी समान शब्द आल्यामुळे गेयता असलेली वाक्ये तयार करा.

वरील शब्दांचा वापर करून तुम्हांला अशा काव्यात्मक ओळी तयार करता येतात का ते पाहा. प्रयत्न करा व छानशी कविता तयार करा.

# १५. असे जगावे

• ऐका. वाचा. म्हणा.

असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना
संकटासही ठणकावून सांगावे, ये आता बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना
स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!





**गुरू ठाकूर** (१९६८) : प्रसिद्ध कवी, गीतकार, कथाकार. 'नटरंग', 'अगं बाई, अरेच्चा', 'घर दोघांचे', 'टाइमपास' यांसारख्या अनेक प्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपटांसाठी गीतलेखन.

ज्यांची इच्छाशक्ती प्रबळ असते त्यांना संकटांतही मार्ग सापडतात. संकटांचा हसून सामना करावा, तसेच आयुष्यामध्ये काहीतरी चांगले कार्य करून जावे, असा संदेश कवीने प्रस्तुत कवितेतून दिला आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कवेत अंबर घेताना | (अ) जगाला गहिवर यावा. |
| (२) काळीज काढून देताना | (आ) अनेक मार्ग मिळतात. |
| (३) शेवटचा निरोप देताना | (इ) ओठांवर हसू असावे. |
| (४) इच्छा दांडगी असेल तर | (ई) पाय जमिनीवर असावेत. |

**प्र. २. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना

**प्र. ३. संकटात कसे वागावे हे कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ४. 'कातर कातर अवस्था' म्हणजे खूप वाईट वाटल्यावर होणारी स्थिती. तुमच्या मित्राची अशी अवस्था झाल्यास तुम्ही कोणती मदत कराल?**

**प्र. ५. 'संकटांना न घाबरता तोंड द्यावे', याविषयी तुमच्या वाचनात आलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन करा.**

**प्र. ६. कवीने या कवितेतून दिलेला संदेश तुमच्या शब्दांत लिहा.**



### चर्चा करूया.

- आयुष्य जगताना स्वप्ने पाहावी.
- इच्छा असेल तर मार्ग मिळतो.

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार व अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) नजर रोखणे. | (अ) वास्तवाचे भान ठेवणे. |
| (२) पाय जमिनीवर असणे. | (आ) प्रिय गोष्ट दुसऱ्याला देणे. |
| (३) हसू ओठांवर असणे. | (इ) निर्भयपणे पाहणे. |
| (४) कवेत अंबर घेणे. | (ई) आनंद होणे. |
| (५) काळीज काढून देणे. | (उ) अशक्य गोष्ट शक्य करणे. |

**(आ) कवितेतील शेवट समान असणारे शब्द लिहा.**

(१) अत्तर (२) ताऱ्यांची (३) जाताना

**(इ) खालील अधोरेखित शब्दांसाठी समानार्थी शब्द वापरून ओळी पुन्हा लिहा.**

(१) पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना.

(२) असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर.

(३) असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर.

(४) नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर.

(५) स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर.



## वाचा.

सर वर्गात आले. त्यांनी निबंधलेखन स्पर्धेचा निकाल सांगितला व म्हणाले, ''मला अनिताचा व सुरेशचा निबंध खूप आवडला. कोणाचा निबंध निवडावा हे मला समजत नव्हते. दोघांच्याही निबंधांतला आशय मनाला विचार करायला लावणारा आणि स्वत:च्या अंतरंगात डोकवायला भाग पाडणारा आहे; पण तरीही मी सुरेशच्या निबंधाची निवड का केली असावी, तर सुरेशचे सुवाच्य, वळणदार अक्षर व शुद्ध, बिनचूक लेखन.''

प्रत्येकाच्या अक्षराचे वळण वेगवेगळे असते. काहींचे अक्षर टपोरे, वाटोळे व बाकदार असते. अक्षरांत एकसारखेपणा असतो. दोन अक्षरांतले, दोन शब्दांतले अंतर सारखे असते. अक्षरांचा आकार योग्य असतो. लेखनात स्वच्छता, टापटीप जाणवते. अशा लेखनाला, अक्षरांना एक सौंदर्य प्राप्त झालेले असते, तर काहींचे अक्षर खूप गिचमीड असते. ते वाचनीय नसते. हत्तीचा पाय मुंगीला लावल्यावर जसे दिसेल तसे ते अक्षर असते. असे अक्षर कुणाला वाचावेसे वाटेल का? ते अशुद्ध लेखन वाचताना कंटाळा येतो आणि डोळ्यांवर ताण येऊन उगाचच दमणूक होते.

आपले लेखन जेवढे सुवाच्य, सुंदर, वळणदार पाहिजे, तेवढेच शुद्ध आणि बिनचूकही असावे. अशा सुंदर अक्षराची देणगी मिळवण्यासाठी अपार मेहनत घ्यावी लागते. सुंदर अक्षर काढण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे लागतात. न थकता, न कंटाळता रोजच्या सरावातून अक्षरांना योग्य वळण मिळते. अक्षरांना बाकदारपणा येतो आणि मग हळूहळू मोत्यांसारखी सुरेख अक्षरे कागदावर उमटू लागतात. अक्षर बिघडू नये, यासाठी कधीही अक्षरांकडे डोळेझाक करून चालत नाही. सुंदर अक्षर हा सुरेख दागिना आहे. 'हा दागिना मी कायमस्वरूपी माझ्याजवळ ठेवीन,' असा वसा प्रत्येकानेच घेतला पाहिजे.



## सारे हसूया.



**रमा** : काय गं, गहू कसा आणलास?

**उमा** : पिशवीतून आणला.


**रमा** : तसं नाही गं, म्हणजे कोणत्या भावानं आणला ?

**उमा** : माझ्या चुलतभावानं आणला.



मुलांनो, तुम्ही दररोज मोबाइल व संगणक हाताळत आहात. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विविध सोईसुविधा आपल्याला या माध्यमांद्वारे पुरवल्या जातात.

या सुविधा म्हणजेच वेगवेगळ्या प्रकारची सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स असतात. त्याला तुम्ही ॲप्स असेही म्हणता.




तुम्हांला येथे काही ॲप्सची सांकेतिक चिन्हे दिलेली आहेत. या चिन्हांना काय म्हणतात, ही ॲप्स कशासाठी वापरली जातात, याची माहिती घरातील मोठ्या व्यक्तींकडून जाणून घ्या व लिहा.

**• *विचार करा. सांगा.***

- तुम्हांला मोबाइल/संगणकावरील कोणती ॲप्स वापरायला आवडतात?
- अभ्यास करण्यासाठी अशा एखाद्या ॲप्सचा वापर करणे तुम्हांला आवडते का? सकारण सांगा.
- या विविध ॲप्सचा उपयोग तुम्हांला आवश्यक वाटतो का? असल्यास/नसल्यास का ते सांगा.
- मोबाइल/संगणकावरील ॲप्स वापरताना तुम्ही कोणती दक्षता घ्याल ?

- तुम्हांला अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टी कठीण वाटतात? त्यासाठी कोणती ॲप्स तयार व्हावीत असे तुम्हांला वाटते?

# १६. कोळीण

भाग-४

**मारुती चितमपल्ली** (१९३२) : पक्षी-वन्य जीवनविषयक ग्रंथकार, प्रसिद्ध लेखक. अनेक पुरस्कारांनी सन्मानित. 'पक्षी जाय दिगंतरा', 'जंगलाचं देणं', 'रानवाटा', 'शब्दांचं धन', 'रातवा', 'मृगपक्षिशास्त्र', 'घरट्यापलीकडे', 'पाखरमाया', 'निसर्गवाचन', 'सुवर्णगरुड', 'आपल्या भारतातील साप', 'पक्षिकोश', 'आनंददायी बगळे' इत्यादी पुस्तके प्रकाशित.

कोळीण आपले सावज कसे पकडते, आपल्या घराचे दार बंद होऊन आपण असुरक्षित होऊ नये, यासाठी ती कोणती काळजी घेते याचे चित्तवेधक वर्णन प्रस्तुत पाठात लेखकांनी केले आहे.

हॉलीवूडपासून दूर अशा डोंगराकडे मी गाडी वळवली. पायथ्याला गाडी ठेवून मी डोंगर चढून वर गेलो. वाकून जमिनीचं लक्षपूर्वक निरीक्षण करू लागलो. मध्येच एक गुडघा टेकून मी सुकलेलं गवत बाजूला सारायचो. कोणी मला अशा अवस्थेत पाहिलं, तर त्याला वाटेल, की माझं काहीतरी हरवलंय आणि ते मी शोधत आहे.

मी ज्याचा शोध घेत होतो ते मला डोंगरमाथ्यावर जवळ जवळ एका तासानं दिसलं. एखादं निकेलचं नाणं उडवावं अन् ते अर्धं मातीत झाकलं जावं तसं ते दिसत होतं. मोठ्या अचूकतेनं बांधलेलं ते कोळ्याचं झापड असलेलं घरटं होतं. आजूबाजूचं गवत आणि हिरव्या शेवाळावर ते रंगगोपनामुळे दिसत नव्हतं.

मी खाली वाकून माझ्या चाकूच्या पात्याचं टोक दाराच्या बाजूला लावलं आणि दार उघडलं. त्या भेगेतून आत पाहिलं. दार उघडलं जाऊ नये, म्हणून कोळिणीनं ते घट्ट धरून ठेवलं होतं. मी कोळीण म्हटलं आहे, कारण नर कोळी आकारानं लहान असतात. त्यांच्या वास्तव्याचा सुगावा लागत नाही. हे घरटं कोळिणीचं होतं. जमिनीत जवळ जवळ एक फूट खोलीवर, न दिसणारं ते घरटं, त्याचं दार आणि अस्तर सारं काही रेशमाच्या धाग्यानं घट्ट असं विणलं होतं.

मला आश्चर्य वाटलं, की कोळिणीनं चाकूचं टोक इतक्या विलक्षण ताकदीनं ओढावं. पातं चांगलंच वाकलेलं दिसलं. मी दार सोडून दिलं. अंधार पडल्यावर मला परत यायचं होतं. रात्रीच्या वेळी कोळीण ज्या वेळी कार्यरत असते, त्या वेळी तिचं छायाचित्र घ्यायचं होतं. चाकूचं पातं बाजूला काढताक्षणीच दार घट्ट बंद झालं. घाबरलेली कोळीण ते दार आतून ओढत होती. बाटलीचं बूच बसावं तसं दार पक्कं झाकलं गेलं. ते इतकं पक्कं बसलं, की त्याच्यात फटदेखील दिसत नव्हती.

माझी साधनसामग्री घेऊन तिथं सायंकाळी पोहचलो. चंद्राच्या मंद प्रकाशानं उजळलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर डोंगर काळे दिसत होते. चंद्राच्या प्रकाशानं, तसंच शहरातील विजेच्या दिव्यांमुळे राशीचे ढग प्रकाशमान झाले होते. पावसाची लक्षणं दिसत होती. ज्या घरट्याजवळ खूण केली होती, तिथं जवळच एका दगडावर मी बसलो आणि अंधूक प्रकाशात जमिनीचं निरीक्षण करू लागलो. झाकलेल्या दरवाजाची कमान मला दिसली.

वसंतऋतूतील तो शेवटचा काळ, परंतु सायंकाळी हवा गार होती. गारठा निर्माण करत ओलसर वारं खोऱ्याकडे वाहत होतं; परंतु माझ्या पायानजीकच्या त्या लहान जगात मी असा काही गुंग झालो होतो, की बाहेरच्या जगाचा मला विसर पडला.

मी स्तब्ध बसलो. माझं सारं लक्ष कोळिणीच्या घराच्या बंद दाराकडे होतं. कसलीही हालचाल नव्हती. कसलंही चैतन्य नव्हतं. एखाद्या दगडासारखा बसून मी शांतपणे तासभर निरीक्षण करत होतो. जरी दार बंद असलं, तरी आतल्या कोळिणीला माझ्या अस्तित्वाची जाणीव होती. मला वाटायचं, की थोड्याच कालावधीत तिला माझा सराव होईल; परंतु दारापलीकडच्या छिद्रातून जिवंतपणाची कसलीच लक्षणं दिसत नव्हती.

थंडगार वाऱ्यानं गवताची पाती डोलायची. पुन: शांत. पावसाचा कुठेतरी शिडकावा झाला, त्यामुळे जमीन थोडी ओलसर झाली. पुन: शांत. त्या थंडगार दगडावर बसून मी चांगलाच गारठलो.

मला वाटलं, की आपण दाराची हालचाल पाहिली. मी एकाग्रचित्त होऊन त्याकडे पाहत होतो. पुन: ते हाललं नाही. मला उगीच तसा त्या अंधारात भास झाला असावा. ते चोरदार किंचित उघडलं. काही क्षण किलकिलत्या दाराजवळ कोळीण वाट पाहत होती. मला ते माहीत होतं.

तिथं गूढ होतं. त्या गूढतेचा तणाव आजूबाजूच्या वातावरणावर आला होता. कोळीण दाराजवळ दबा धरून प्रतीक्षा करत होती. सापळा तयार होता. सावज जवळ येण्याची ती वाट पाहत होती. ते सारं चमत्कारिक होतं. कीटकाच्या लहान जगातील ती अनिश्चिती आणि धोका होता. कोळीण दबा धरून लहान जीवाच्या पावलाची सावट ऐकत रात्रभरही राहिली असावी.



सावज पार तिच्या घराच्या उंबरठ्यावर पोहोचेपर्यंत कोळिणीला वाट पाहावी लागते. मगच त्याच्यावर झडप घालून त्याला आत ओढावं लागतं; पण तिला बिळाचं संरक्षण सोडून जाता येत नाही. जर का कोळिणीनं आपलं बिळ सोडून दिलं असतं अन् दार तिच्या पाठीमागे लागलं असतं, तर तिला ते कधीच उघडता आलं नसतं. घराचा उंबरठा तिला पारखा झाला असता. चोरट्या पावलानं फिरणाऱ्या बाहेरच्या शत्रूपासून संरक्षण व्हावं, म्हणून तिनं या दाराची अशी रचना केली होती. तिच्या माघारी ते दार बंद झालं, तर ते असं काही घट्ट बसेल, की असहाय होऊन गवतातील काळ्या जगात तिची पारध झाली असती. झेप घेऊन कोळिणीनं अचूकपणे सावजाला पकडायला हवं असतं. तिच्या केसाळ हाताचा पंजा सावजाभोवती आवळला गेला पाहिजे, नाहीतर सावज निसटून जातं; परंतु त्याच वेळी तिचं एक पाऊल दारात असतं. तिच्या माघारी दार बंद होणं म्हणजे तिचा मृत्यूच.

बिळापासून एक हातभर अंतरावर दंवारलेल्या गवतात काहीतरी हललं. पाती बाजूला लवली, तसं राखी पाठ असलेलं पावट्याएवढं सोबग दिसलं. ते वेडंवाकडं जमिनीवरून जात होतं. काहीतरी शोधत होतं. मध्येच गिरकी घेत फांदीवर आदळत होतं. पुन: मागे वळत होतं, अन् अडखळत कोळिणीच्या सापळ्याजवळ जात होतं. एखाद्या चित्रपटातील पुढे काय होतं अशा उत्कंठा वाढवणाऱ्या गूढ दृश्यासारखं ते होतं. प्रेक्षक म्हणून मला त्यातील भयानक धोक्याची जाण होती; परंतु काही साहाय्य करता येत नव्हतं. सावज पुढे पुढेच जात होतं. शेवटच्या क्षणी ते वळलं. अरेच्या ते वाचलं तर! पण पुन: चुकून मृत्यूच्या दाराकडेच ते जात होतं.

ते सोबग अटळपणे त्या सापळ्याकडेच जात होतं. कोळिणीनं हालचाल केली तसं दार कंपित झालं. दार जसं किंचित किलकिलं झालं तशी एक काळी रेषा दिसली. जमिनीखालच्या तिच्या जागेपासून वर असलेलं सोबग तिला दिसत नसलं तरी त्याच्या आगमनाची चाहूल तिला लागली होती. क्षणभर कीटकाच्या पावलांचा कंप तिला जाणवला. त्याच्या पावलांचा आवाज जमिनीखालून तिनं ओळखला होता.

सोबग वेडंवाकडं चालत तिच्यापुढे जात होतं. दार हाललं. थोडं उघडलं गेलं. कोळीण आता अस्वस्थ झाली होती, अधीर झाली होती. दारापलीकडच्या काळ्या पोकळीकडे मी टक लावून पाहत होतो. त्या चिरेतील अंधारातून काहीतरी चमकताना मला दिसलं. कोळिणीचे डोळे चंद्राच्या प्रकाशात चमकत होते.

निश्चित नसलेली परिस्थिती तिथं रेंगाळत होती. सोबग वाट पाहत असलेल्या मृत्यूकडेच जात होतं. सोबग माझ्या मनात व्यक्तीसारखं साकार झालं. एखाद्या दु:खी आणि विनोदी पात्रासारखं. त्या अजागळ कीटकाबद्दल मला सहानुभूती वाटत होती; परंतु मी तटस्थ राहिलो.

सोबग जवळ गेलं. दार किंचित खाली पडलं.

दाराजवळ येणाऱ्या सोबगच्या पावलांचा कंप जसा जवळ येऊ लागला, तशी कोळीण चुळबुळ करू लागली. कीटकांच्या जगाला आवाजातील तीव्रता कळत असावी. कोळिणीला सोबगच्या पावलांचा आवाज ऐकू येत असावा, तर माझ्या पावलांच्या आवाजानं तिला काय वाटत असावं! परंतु मला जिकडेतिकडे विलक्षण शांत वाटत होतं. दुसऱ्या जगातील म्हणजे शहरातील संमिश्र आवाज येत होते. दूरवरचा कर्कश भोंगा, मोटारींच्या कर्ण्यांचे व आगगाड्यांचे आवाज ऐकू येत होते.

सोबग छिद्रापासून एक इंच दूर होतं. ते दृश्य मोठं भयानक होतं. त्यानं माझं लक्ष वेधलं. सोबग एखाद्या खुळ्यासारखं नकळत कोळिणीच्या दाराकडे नेणाऱ्या वाटेनं जात होतं. ते तिथं पोहचलं. छिद्रासमोर आलं. दार हाललं नाही. सावज जवळ आल्याची जाणीव कोळिणीला निश्चितपणे झाली होती. तिनं आता अजिबात हालचाल केली नाही. तिथल्या जमिनीप्रमाणे दारही स्तब्ध होतं. सोबगची आता सुटका होईल, असं मला वाटलं. माझ्या अस्तित्वामुळे कोळीण अस्वस्थ झाली असावी. कदाचित नकळत मी सोबगचा जीव वाचवला असेल. मला थोडंसं बरं वाटलं. काळ्या फटीत काहीही हालचाल नव्हती. कोणत्याही जिवाचा मागमूस नव्हता. धोक्याच्या मर्यादेबाहेर सोबग गेलं होतं. काही पावलं गेलं असतं की बचावलं असतं. इतक्यात काळी राक्षसीण जमिनीतून वर आली. दार सताड उघडलं गेलं. केसाळ हात एखाद्या दांडक्यासारखा बडवत त्या कुरूप प्राण्यानं छिद्रातून उडी घेतली. घोंगडी घालावी तसं पुढच्या पायांनी त्याला आवळलं अन् लगेच दृष्टिआड झाली. परत जमिनीखालच्या गूढ अंधाऱ्या जगात गेली. एका क्षणात कोळीण दिसली आणि सावजाला पकडून नाहीशी झाली. पार जमिनीच्या पडद्याआड. तिच्या पाठोपाठ किंचित आवाज करत दार बंद झालं. मला इथे बसल्या बसल्या तो आवाज ऐकू आला होता.

मला या घटनेची अपेक्षा होती; परंतु कोळिणीच्या अकस्मात दिसण्यानं आश्चर्यचकित झालो. हे सारं पाहत असताना बाहेरच्या जगाचा मला विसर पडला. गवताळ डोंगरावरच्या त्या वीतभर जागी माझं लक्ष केंद्रित झालं होतं. गार वाऱ्याची झुळूक लागली. वाटलं आता पुन्हा पाऊस येणार. मी पार गारठून शहरातील दिव्यांच्या प्रकाशाकडे पाहत होतो.

नंतर कोळिणीची घरटी असलेल्या जमिनीची एक डझनभर ढेकळं मी माझ्या स्टुडिओत आणली. खोलीच्या मध्यभागी असलेल्या टेबलावर ठेवली. त्यावर रात्रंदिवस प्रकाशाचा झोत टाकला. अंधाराचा पडदा सोडून कोळिणीला आपलं भक्ष्य उजेडात घेण्याची सवय लागावी म्हणून मी प्रयत्न करत होतो. याची आवश्यकता होती, नाहीतर तिचं रंगीत फिल्मनं चित्रण करता आलं नसतं.

अगदी क्षुद्र कीटकांच्या जगातही व्यक्ती-व्यक्तीनुसार प्रकृतीतही बदल होत असल्याचं पाहून प्रभावित झालो. बुद्धिशून्य अथवा मेंदूची कसलीही यंत्रणा नसलेल्या कोळिणीच्या व्यक्तिमत्त्वात खूप फरक असल्याचं दिसून आलं. डझनभर कोळिणींपैकी कित्येकींनी अन्नाचा पुरवठा करण्याच्या कुठल्याही पद्धतीचा अवलंब करण्याचं अजिबात नाकारलं. त्यांनी अक्षरश: स्वत:ला कोंडून घेतलं. आपली दारं आतून जाळी विणून बंद केली. ही ताटी त्यांनी पुन्हा कधीही उघडली नाही. जणूकाही त्यांनी समाधीच घेतली.

काहीजणी जगण्याइतपत क्वचितच खात. सावजाला पकडण्याच्या नाट्याचं चित्रण मला कॅमेऱ्यानं कधीच करता आलं नाही. एका कोळिणीनं आपल्या घरट्याचा त्याग केला. कदाचित ती हिरव्या कुरणाच्या शोधात गेली असावी. चमत्कारिक अशा सतत प्रकाशाच्या झोतात राहण्यापेक्षा बाहेरच्या धोकादायक जगात जगण्याचं तिनं स्वीकारलं. नंतर काही आठवड्यांनी नि:सत्त्व आणि सुकलेल्या अवस्थेत ती खोलीच्या एका कोपऱ्यात सापडली. फिल्मच्या दोन डब्यांमध्ये सरपटत जाऊन तिनं त्या जागेत तंतूनं आपलं घरटं बांधण्याचा प्रयत्न केला होता.

त्या डझनभर कोळिणींपैकी फक्त एकीनं माझ्या आवश्यकतेप्रमाणं स्वत:ला जमवून घेतलं. माझ्या चित्रपटाची जणू ती तारका बनली. मी डोंगरात पाहिलेल्या दृश्याची पुनरावृत्ती तिला खुणावताच मोठ्या चमत्कारिकरीत्या माझ्या कॅमेऱ्यासमोर ती करून दाखवी. प्रतीक्षा आणि तिची अकस्मात झडप अशी मी पूर्वी पाहिली होती तशी ती करी.

सोबगला ती अगदी सहज पकडे. माझं त्यामुळे समाधान होईना. वाटे की काहीतरी रोमहर्षक घटना घडायला हवी. फाशाच्या दारावरच्या कोळिणीशी एका काळ्या कोळिणीनं अजिबात संघर्ष केला नाही. सोबग जसं नाहीसं होई तशीच एखादी जादूची कांडी फिरावी तशी ती नाहीशी होई. पहिल्यांदा ज्या वेळी काळ्या कोळिणीला तिनं छिद्रात खेचलं, तेव्हा पाहण्यात काही चूक तर झाली नसेल ना असं वाटलं. माझी थोडीफार अपेक्षा होती, की दार ढकलून धुळीचे हात झाडत, माझ्या तारकेला झोडपून ती बाहेर येईल; परंतु दुसऱ्या दिवशी तिथं सुरकुतलेलं काळं कलेवरच मला पाहायला मिळालं. माझ्या नटीनं तिला पार शोषून टाकलं होतं.

मला हवं होतं की माझ्या कोळीण तारकेला सावज सहजपणे छिद्रात ओढून नेता येऊ नये. कॅमेऱ्यानं तिची चांगली दृश्यं टिपायची होती. ज्या वेळी सावज पकडायचं त्याच वेळी ती जमिनीवर येई, तेव्हाच तिचं निरीक्षण करायला मिळे. हे दृश्य एखाद्या विजेच्या गतीनं नाहीसं होई.

कोळिणीच्या दारातून न जाणाऱ्या कीटकाची सावज म्हणून निवड केली, तर त्यांच्यात बराच वेळ चालणाऱ्या झटापटीचं चित्रण करता येईल असं वाटलं; परंतु कोळीण अजिबात त्याच्या वाटेला जात नसे. मोठा कीटक तिच्या दारापर्यंत जलद जाई; परंतु दार उघडले जात नसे. माझा तर्क असा, की मोठा कीटक जोरानं आवाज करत असावा. कोळिणीला अशा नाट्यात अजिबात रस नव्हता. तिला हवं होतं रोजचं खाणं.

बागेतील दगडाखाली कोळिणीचं भक्ष्य शोधताना मला एकदा लहान शतपाद मिळाला. सोबगचा जसा ती निकाल लावत असे, त्याप्रमाणे शतपादाची विल्हेवाट तिनं लावली. मी शतपाद मिळवण्याचा शोध सुरू केला. मी आठ पाय असलेले कीटक जमा केले. माझ्या खोलीतल्या बाटल्यांमधून सर्व आकाराचे शतपाद भरून ठेवले. जर शतपाद ठेवायचे तर त्यांच्या खाण्याचीही सोय करायला हवी. कॅमेऱ्यानं क्षणैक दृश्यं टिपत होतो, तसंच बागेत दगडांची उलथापालथ करण्यात अनेक तास जात.

वालनट जसे लहान, मध्यम आणि मोठे असे प्रतवार लावतात, तसे मी शतपाद लावले. त्यात अति-लहान, मध्यम लहान, लहान, मध्यम मोठे-लहान, लहान-मध्यम अशी प्रतवारी तयार केली. मी रोज कोळिणीला शतपाद खाऊ घालायचा. गेल्या आठवड्यात दिल्यापेक्षा आकारानं मोठा शतपाद प्रत्येक आठवड्यात द्यायचा.

माझ्या कोळिणीला मी अतिशय श्रमपूर्वक आणि कौशल्यानं पढवत होतो. प्रत्येक आठवड्यात ती मोठ्या आकाराच्या शतपादाचा स्वीकार करी. असं करत लोभ आणि अधीरतेनं तिनं भल्यामोठ्या शतपादावर झडप मारली. शतपादाला शंभर पाय असले तरी त्यांतील पन्नास जमिनीला खिळून राहायचे. राहिलेले पन्नास पाय धडपडत आणि वळवळत स्वत:चं संरक्षण करण्याकरिता तिला घट्ट पकडण्याचा प्रयत्न करत असत. कितीतरी सेकंद हे नाट्य चालू असताना ते मी कॅमेऱ्यानं टिपत असे. एकदा तर शतपादानं लढाई जिंकली होती. दारात डोकं सापडून तो सर्पाप्रमाणे वळवळत होता. असा समय आला होता, की त्यानं माझ्या कोळिणीला छिद्रातून बाहेर खेचलं असतं. दार किंचित उघडं होतं. त्यातून तिचे पाय दिसायचे. त्याच्याशी झटापट करत असता ती कलंडली अन् आपल्या शत्रूला तिनं आत ओढलं. कुठेतरी ढिलाई झाली. शतपाद तिच्याभोवती वेटोळं घालण्याचा प्रयत्न करत होता. काही क्षणांतच त्याचे शंभर पाय हवेत वळवळत होते. त्या क्षणी संधी साधून कोळिणीनं शतपादाला विळखा घातला अन् त्याला घेऊन ती छिद्रात नाहीशी झाली. काळं छिद्र झाकलं गेलं, अन् मागे फक्त दरवाजा लागल्याचा आवाज आला.

***

## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**

कोळिणीचे छायाचित्र घेण्यासाठी लेखकाने केलेल्या कृती

**प्र. २. असे का घडले ते लिहा.**

(अ) लेखक डोंगरावरच्या जमिनीचे निरीक्षण करू लागले.
(आ) लेखकांना बाहेरच्या जगाचा विसर पडला.
(इ) लेखकांनी कोळिणीच्या घरट्याचे उघडलेले दार सोडून दिले.
(ई) कोळिणीला बिळाचे संरक्षण सोडून जाता येत नाही.

**प्र. ३. खालील घटनांचे परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (अ) लेखकांनी चाकूच्या पात्याचं टोक कोळिणीच्या घरट्याच्या दाराला लावलं. | |
| (आ) पावसाचा कुठेतरी शिडकावा झाला. | |
| (इ) कोळिणीच्या माघारी दार बंद होणे. | |
| (ई) कोळिणीला सोबगच्या पावलांचा आवाज आला. | |

**प्र. ४. आकृतीत दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उत्तर लिहा.**

कोळिणीच्या घरट्याची वैशिष्ट्ये

- घरट्याचे ठिकाण
- घरट्याचे दार
- दाराला दिलेली उपमा
- दाराची विशेष रचना
- घरट्याचे महत्त्व

**प्र. ५. तुम्हांला पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या घरांची नावे माहीत आहेत. ती खालील चौकटींत लिहा.**

| सुगरण | साप | वाघ | गाय | घोडा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## खेळूया शब्दांशी.

- **खालील वाक्प्रचारांच्या अर्थातील योग्य अर्थ शोधून लिहा.**

(अ) प्रतीक्षा करणे — वाटेने जाणे. / वाट बघणे. / वाट लावणे.

(आ) पारखा होणे — वंचित होणे. / दुरून बघणे. / दु:स्वास करणे.

(इ) पारध होणे — भक्ष्य शोधणे. / भक्ष्य होणे. / शिकार होणे.

## आपण समजून घेऊया.

### (५) केवलवाक्य

(अ) ती रोज सकाळी लवकर उठते.

(आ) तो कसोटी सामन्यात खेळतो.

ही **केवलवाक्ये** आहेत. केवलवाक्यात एकच विधान असते, त्यामुळे एक उद्देश्य व एकच विधेय असते. केवलवाक्य हे विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी किंवा नकारार्थी यांतील कोणत्याही प्रकारचे असू शकते.

### (६) मिश्रवाक्य

(अ) जेव्हा मनात येईल, तेव्हा मी गावाला जाईन.

(आ) पावसाळा आला, की आकाशात काळे ढग जमतात व पाऊस पडू लागतो.

ही **मिश्रवाक्ये** आहेत. मिश्र वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये असतात, जी एकमेकांवर अवलंबून असतात. अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असणारे वाक्य 'मुख्य वाक्य' असते, तर मुख्य वाक्यावर अवलंबून असणारे वाक्य गौणवाक्य असते.

उदा., वरील वाक्यांत 'मी गावाला जाईन' व 'पावसाळा आला' ही दोन मुख्य वाक्ये आहेत.

कधीकधी एका मुख्य वाक्यावर एक किंवा अधिक गौणवाक्ये अवलंबून असतात. ही गौणवाक्ये उभयान्वयी अव्ययाने एकमेकांना जोडलेली असतात.

### (७) संयुक्तवाक्य

(अ) मंदा रोज सकाळी गणिताचा अभ्यास करते आणि संध्याकाळी मराठीचा अभ्यास करते.

(आ) मिहिर खो खो किंवा लंगडी या खेळात भाग घेईल.

ही **संयुक्तवाक्ये** आहेत. संयुक्तवाक्यात दोन वाक्ये असतात. ती दोन वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात; पण ती स्वतंत्र असतात, म्हणजे ती दोन केवलवाक्ये असतात. अर्थाच्या दृष्टीने ती एकमेकांवर अवलंबून नसतात. ते एक जोडवाक्य असते.

# १७. थेंब आज हा पाण्याचा



• ऐका. वाचा. म्हणा.

शब्द जाऊ दे, अर्थ राहू दे, विषय आहे गाण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।धृ.।।

मोती बनुनी सरसर येती, वर्षेमधल्या सरीतुनी
माळ ओवते, निसटुन जाते, बावरते जणू परी कुणी
या मोत्यांचा संचय कर तू, प्रश्न तुझ्या रे जीण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।१।।

आभाळातिल ह्या मोत्याने, मातीमधुनी पिकती मोती
निसर्ग जाणी मोल तयाचे, तुम्ही माणसे का मग कोती ?
संचय करता तिजोरीतल्या, खणखणत्या त्या नाण्यांचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।२।।

कशास ऐसा वेडाचाळा, स्वत: होऊनी ठगण्याचा
दृष्टिकोन तू बदल आता रे, निसर्गास ह्या बघण्याचा
तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा ?
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।३।।

**सुनंदा भावसार** (१९५९) : नियतकालिकांतून पर्यावरणविषयक कवितांचे लेखन. विविध कार्यक्रमांतून पर्यावरणविषयक कवितांचे सादरीकरण. 'पर्यावरण गीत गंगा' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवयित्रीने मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व विशद केले आहे.

## स्वाध्याय 

**प्र. १. कवयित्रीने असे का म्हटले असावे ते तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) या मोत्यांचा (पाण्याचा) संचय कर.

(आ) निसर्गाला जे कळते ते माणसाला कळत नाही.

**प्र. २. खाली दिलेल्या अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा.**

(अ) आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या थेंबाने धान्य पिकते.

(आ) मनुष्य खणखणत वाजणाऱ्या नाण्यांचा तिजोरीत संग्रह करतो.

(इ) निसर्गाचे मोल न जाणणे हे स्वत:ला फसवण्यासारखे आहे.

**प्र. ३. संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) आभाळातील मोती.

(आ) मातीतील मोती.

(इ) मोत्यांचा संचय.

(ई) बहुमोल थेंब.

**प्र. ४. खाली दिलेल्या ओळींतील विचार सांगा.**

तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा ?
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।

**प्र. ५. माणसाने निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

**प्र. ६. फरक स्पष्ट करून तक्ता पूर्ण करा.**

| | माणसाचे धन | निसर्गाचे धन |
|---|---|---|
| कोणते ? | | |
| कोठे ठेवतात ? | | |
| उपयोग | | |

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे अर्थ समजून घेऊन त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

उदा., मोल-बहुमोल, अनमोल.
मोल-मातीमोल, कवडीमोल.

**(आ) माती-मोती अशा शब्दांच्या अर्थात केवळ एका मात्रेमुळे खूप फरक होतो. अशा शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

**प्रकल्प :**

(१) सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या दुतर्फा पाणीबचतीच्या संदर्भात आपल्यासाठी काही संदेश लिहिलेले असतात. त्यांचा संग्रह करा. त्यांतील तुम्हांला आवडलेल्या संदेशांचे फलक तयार करून शाळेच्या परिसरात लावा.

(२) 'निसर्ग वाचवा' याविषयी घोषवाक्ये तयार करून खालील फलकांवर लिहा.



## लिहिते होऊया.

- **पाऊस पडलाच नाही, तर..... कल्पना करा. खालील मुद्द्यांच्या आधारे निबंधलेखन करा.**
  - (१) पाण्याचा दुष्काळ.
  - (२) दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम.
  - (३) शेती व उद्योगधंदे यांच्यावर होणारा परिणाम.
  - (४) नदी, नाले, विहिरींची स्थिती.
  - (५) सजीवांवर होणारा परिणाम.



## विचार करा. सांगा.

- पाणी कसे तयार होते ?
- पाणी कोठे साठवले जाते ?
- पाण्याचा वापर कशाकशासाठी होतो ?
- जलप्रदूषण म्हणजे काय ?
- जलप्रदूषणाची कारणे कोणती ?
- जलप्रदूषण रोखण्यासाठी काय करावे, असे तुम्हांला वाटते ?
- जलसंवर्धनासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?

**वाचा.**
**लक्षात ठेवा.**

- पाणी फेकून देऊ नका.
- पाणी हवे तेवढेच वापरा.
- पाण्याचा पुनर्वापर करा.
- जवळच्या धरणाला भेट देऊन धरणाचा उपयोग समजून घ्या.
- पाणी घेतल्यानंतर नळ लगेच बंद करा.

**'पाणी अडवा, पाणी जिरवा.'**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या विषयांवर आधारित घोषवाक्ये, सूचना सुवाच्य अक्षरांत लिहून घ्याव्यात. वर्गात किंवा शाळेच्या परिसरात लावाव्यात.

# आभारपत्र

- **सुमीतच्या शाळेत १४ नोव्हेंबर रोजी बालदिनाचे आयोजन करण्यात आले होते. सुमीत शाळेतील सांस्कृतिक विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी आहे. बालदिनाच्या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित असणाऱ्या डॉ. हेमंत साळवे (माजी मुख्याध्यापक) यांचे आभार मानण्यासाठी सुमीतने त्यांना पत्र पाठवले आहे. ते अभ्यासा.**

**दिनांक :** १५.११.२०१७

**प्रति,**

मा. डॉ. हेमंत साळवे
माजी मुख्याध्यापक
विद्यावर्धिनी विद्यालय,
उस्मानाबाद.

आदरणीय महोदय,

स. न. वि. वि.

१४ नोव्हेंबर रोजी बालदिनाच्या निमित्ताने आमच्या शाळेच्या कार्यक्रमासाठी आपण वेळात वेळ काढून उपस्थित राहिलात व आम्हां सर्व मुलांना मार्गदर्शन केले, याबद्दल सांस्कृतिक विभाग व शाळेच्या वतीने मी आपले आभार मानत आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपण पंडित जवाहरलाल नेहरू व विद्यार्थी यांच्याबद्दल अनेक कथा सांगितल्या. त्या कथा आम्हां सर्व विद्यार्थ्यांना खूप आवडल्या. तसेच विद्यार्थी कसा असावा, याबाबतही आपण मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून आम्हांला निश्चितच नवी दिशा मिळाली आहे.

खरेतर आपला रोजचा दिवस अत्यंत व्यस्त असतो, त्यातूनही वेळ काढून आपण कार्यक्रमास उपस्थित राहिलात, याबद्दल आपले पुनश्च मनापासून आभार.

आपला नम्र,
सुमीत
(सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रतिनिधी)

- **जर तुम्हांला एखाद्या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन करायचे असेल, तर कोणत्या गोष्टी विचारात घ्याल, त्याचे सादरीकरण कसे कराल, त्याचा आराखडा तयार करा.**
- **आंतरशालेय क्रीडामहोत्सवात धावण्याच्या स्पर्धेत तुमच्या मित्राने/मैत्रिणीने प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

## आपण समजून घेऊया.

- **खालील तक्त्याचे निरीक्षण करा. शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | क: |
| – | ा | ि | ी | ु | ू | े | ै | ो | ौ | ं | : |

मराठी वर्णमालेचा म्हणजे अक्षरांचा अभ्यास तुम्ही केला आहे. त्या अक्षरांचा वापर करून आपण शब्द लिहितो हे तुम्हांला माहीत आहे. आपण जे बोलतो ते शब्द ध्वनींनी बनलेले असतात. अक्षरे म्हणजे या ध्वनींसाठीची चिन्हे असतात.

ध्वनींचे दोन प्रकार असतात– स्वर आणि व्यंजने. आता आपण मराठी भाषेतील स्वर आणि व्यंजने पाहणार आहोत.

मराठीत अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर आहेत. अलीकडे मराठीत इंग्रजी शब्दांचा वापर सुरू झाल्यामुळे अॅ, ऑ या स्वरांचाही समावेश करण्यात आला.

'लृ' हा स्वर मराठीत फारसा वापरला जात नाही.

क्, ख्, ग्, घ्, ङ्
च्, छ्, ज्, झ्, ञ
ट्, ठ्, ड्, ढ्, ण्
त्, थ्, द्, ध्, न्,
प्, फ्, ब्, भ्, म्
य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, ळ् ही व्यंजने आहेत.
क्ष, ज्ञ ही संयुक्तव्यंजने आहेत.

प्रत्येक ध्वनीसाठी एकच अक्षर आहे असे तुम्हांला वाटते का? एका अक्षराचा एकच उच्चार होतो का?

- हे शब्द उच्चारून पाहा.

चंद्र    चांदणे
आजी    आजोबा
झाड    झकास

असे आणखी शब्द मिळवा.

# १८. वदनी कवळ घेता...

मुखी घास घेता करावा विचार ।
कशासाठी हे अन्न मी सेविणार ।।



वेगवेगळ्या सांस्कृतिक, सामाजिक व कौटुंबिक समारंभांत जेवणाला खूप महत्त्व असते. 'मिष्टान्नम् इतरेजन:' हे मनुष्य स्वभावाला धरूनच आहे, म्हणून अशा समारंभांत पदार्थांचे वैविध्य व रेलचेल असते. यजमान आपल्याला आग्रह करून वाढतात. आपलाही नाइलाज होतो अन् आपल्या ताटात अन्न शिल्लक राहते. अशा वेळी फक्त अन्नच वाया जाते असे नाही, तर त्याबरोबर अनेक घटकांचाही अपव्यय होत असतो.

आज ३१ डिसेंबर. श्रुती जरा नाराजीनंच घरी आली. त्याचं कारणही तसंच होतं. वर्गात तिच्या मॅडमनी तिला नववर्षाचा संकल्प विचारला. इतरांपेक्षा वेगळा संकल्प सांगता न आल्यामुळे ती नाराज झाली. तशीच ती घरी आली आणि ताबडतोब आईबरोबर मावशीकडे गेली. मावशीकडे तिच्या मावसबहिणीचा वाढदिवस होता. झकास बेत होता. गुलाबजाम, केक, कचोरी आणि पुलाव. सगळंच श्रुतीच्या आवडीचं; पण तिनं एक गुलाबजाम खाल्ला अन् डिश बेसिनमध्ये ठेवून दिली.

मावशीनं ते बघितलं. श्रुती उपाशी राहील, म्हणून तिच्या आईच्या कानावर घातलं. घरी आल्यावर आई श्रुतीला खूप रागावली. 'खायचं नव्हतं तर डिश मला का आणून दिली नाहीस?' वगैरे वगैरे. ''मला नाही त्यातलं काही आवडलं,'' श्रुती रागातच म्हणाली. एव्हाना बाबाही आले. तेही श्रुतीला रागावले आणि समजावलं सुद्धा.

खट्टू मनानं श्रुती खुर्चीत मान खाली घालून बसली होती. दूरदर्शनवर बातम्या सुरू होत्या. श्रुतीचे बाबा बातम्या ऐकत होते. श्रुतीनं सहज वर बघितलं. दूरदर्शनवर दाखवलेली मेळघाटमधील कुपोषित बालकं तिनं बघितली आणि लगेच विचारलं, ''बाबा ही बालकं अशी वाळलेली का आहेत हो?'' ''बेटा, त्यांना पुरेसं जेवण मिळत नाही, त्यामुळे प्रोटिन्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स त्यांना मिळत नाहीत, म्हणून ती अशी वाळलेली आहेत.'' बाबांनी सांगितलं.

एवढ्यात आई बाहेर येत म्हणाली, ''आणि ज्यांना जेवायला मिळतं ते टाकून देतात. श्रुती अगं असं जेवण टाकून देऊ नये.''

''माझ्या ऑफिसमध्ये सुद्धा आज किती अन्न पानांत टाकलं आणि त्यात किती लोक जेवू शकतात, याचा केटरिंगवाला बोर्ड लावतो.'' बाबा म्हणाले.

श्रुती उत्साहानं उडी मारून आईला म्हणाली, ''आई नववर्षाचा संकल्प सुचला. मी यापुढे कधीही पानात अन्न टाकणार नाही.''



अन्न शिजवण्यासाठी लागणारे इंधन, गॅस यांचा अपव्यय होतो. खनिज तेल, लाकूड ही इंधने दुर्मिळ होत चालली आहेत. ती वाया घालवणे योग्य नाही.



अन्नपदार्थ तयार करताना मसाले, तेल, तूप वापरतात. पालेभाज्या, फळभाज्या यांच्या वापरांतून पदार्थ बनतात. या घटकांचा देखील अपव्यय होतो.




आपण पानात चपाती, भाकरी, भात असे कितीतरी अन्नपदार्थ टाकतो, त्यामुळे धान्याची देखील नासाडी होते.



अन्न शिजवणाऱ्या व ते शिजवण्यासाठी पूर्वतयारी करणाऱ्या, जसे-पुऱ्या, चपात्या करणारे, भाजी चिरणारे, अन्न वाढणारे, भांडी घासणारे व धुणारे अशा अनेक व्यक्तींचे कष्ट वाया जातात.





उरलेले अन्न कचराकुंडीत फेकून दिले जाते. अन्न खराब झाल्याने त्या परिसरात दुर्गंधी पसरते. अन्नकचरा ही एक समस्या बनू लागली आहे.

**जरा विचार करूया.**

वदनी कवळ घेता नाम घ्या मातृभूचे ।
सहज स्मरण होते आपल्या बांधवांचे ।।
कृषिवल कृषिकर्मी राबती दिनरात ।
श्रमिक श्रम करूनि वस्तू त्या निर्मितात ।।
स्मरण करूनि तयांचे अन्न सेवा खुशाल ।
उदरभरण व्हावे चित्त होण्या विशाल ।।

## आपण हे करू शकतो.



जेवणाऱ्या लोकांना खूप आग्रह करू नका. जेवताना लोक जे मागताहेत ते पदार्थ त्यांना मिळताहेत का, एवढेच पाहणे यजमानाला गरजेचे आहे. लोक पोटभर जेवतात, हवे ते मागून घेतात. त्यांना जास्तीचे अन्न वाढू नका.



आपल्या समारंभाचे स्वरूप मर्यादित ठेवून, जेवणामध्ये देखील अन्नपदार्थांची संख्या कमी ठेवावी, जेणेकरून बनवलेले सर्व अन्नपदार्थ खाल्ले जातील व संपतील.



स्वेच्छाभोजनामुळे जेवणारे लोक त्यांना हवे तेच व हवे तेवढेच पदार्थ वाढून घेतात, त्यामुळे पानात पदार्थांची रेलचेल होत नाही व अन्न वाया जात नाही.



वाया जाणारे अन्न फेकून देण्यापेक्षा गरजू व भुकेलेल्यांना द्यावे.



अन्नावर अवाजवी खर्च करून अन्न वाया घालवण्यापेक्षा त्या पैशांतून गरजू, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना, व्यक्तींना मदत करावी. आपला समारंभ घरगुती व मोजक्या व्यक्तींच्या उपस्थितीत पार पाडून जेवणावळींना फाटा द्यावा. त्यातून वाचणारी रक्कम एखाद्या अनाथाश्रमाला देणगी म्हणून दिली, तर त्यामुळे समाजातील दु:खितांना, गरजूंना थोडासा दिलासा मिळेल.

## शोध घेऊया.



कुपोषण ही एक खूप मोठी समस्या आहे. आदिवासी, दुर्गम भागांत या समस्येचे भयावह स्वरूप पाहायला मिळते. आंतरजालावरून या समस्येची खालील प्रश्नांच्या आधारे माहिती करून घ्या.

(१) ही समस्या का निर्माण होते?

(२) या समस्येच्या निराकरणासाठी कोणकोणत्या संस्था कार्य करत आहेत?

(३) या संस्था कोणत्या स्वरूपाचे काम करतात?

(४) तुमच्या परिसरात एखादे कुपोषित बालक तुमच्या निदर्शनास आल्यास तुम्ही त्याच्यासाठी काय कराल, ते लिहा.



## चर्चा करूया.

(१) आपण वाढदिवसाला कोणकोणत्या गोष्टींसाठी खर्च करतो?

(२) मी माझा वाढदिवस कसा साजरा करू इच्छितो/इच्छिते?

(३) हॉटेलमधील उरलेल्या अन्नाचे काय करतात?

(४) काही कारणास्तव अन्न शिल्लक राहिले, तर तुमच्या घरी त्याचे काय करतात?

**लक्षात ठेवा :**

जेवढी भूक आहे तेवढेच खाणे म्हणजे प्रकृती.

जेवढी भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे म्हणजे विकृती.

आपल्या जेवणातील दोन घास भुकेलेल्यांना खाऊ घालणे म्हणजे संस्कृती.

## स्वाध्याय



**प्र. १. श्रुतीच्या नाराजीच्या परिणामाबाबत तुमचे मत लिहा.**

**प्र. २. आई श्रुतीवर का रागावली?**

**प्र. ३. श्रुतीला नवीन वर्षाचा कोणता संकल्प सुचला?**

**प्र. ४. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

मुखी घास घेता करावा विचार ।
कशासाठी हे अन्न मी सेविणार ।।

- **खाली काही कृती दिलेल्या आहेत. त्या योग्य की अयोग्य आहेत ते ठरवा. पुढे दिलेल्या चौकटींमध्ये ते नोंदवा.**

(अ) वैभवी शाळेत येताना घरी डबा विसरली. त्या वेळी अनुजाने स्वत:च्या डब्यातील पोळीभाजी तिला दिली.

(आ) राजेंद्र सतत बाहेरचे जंकफूड खातो.

(इ) यास्मिन टीव्ही बघत जेवण करते.

(ई) आनंद जेवण करण्यापूर्वी हात स्वच्छ धुतो.

(उ) पीटर जेवताना खूपच बडबड करतो.

(ऊ) रूपाली सर्व प्रकारच्या भाज्या खाते.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

पितो, महिमा, खजिना, पादुका, झोपवितो, गरिबी, बिया, लिली, पहिली, पुरी, चुका, बाहुली, वनिता, विहिरी, सगुणा, भिडू, जिना.

वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवले ?

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार अशी बाराखडीतील चिन्हे (दीर्घ स्वरान्त) आहेत आणि शेवटून दुसऱ्या अक्षरांतील इकार व उकार ऱ्हस्व आहेत.


**शब्दांतील शेवटचे अक्षर दीर्घ स्वरान्त असेल, तर त्या आधीच्या उपान्त्य अक्षरातील इकार व उकार ऱ्हस्व लिहितात.**


या नियमाला अपवाद म्हणजे जेव्हा एखाद्या शब्दाला प्रत्यय लागतो तेव्हा सामान्यरूपातील नामाचे उपान्त्य अक्षर ऱ्हस्व होत नाही.

उदा., पालीला ✓ पालिला ×

बहिणीला ✓ बहिणिला ×

- **खालील चित्रांची नावे लिहा.**



# १९. धोंडा

**डॉ. संजय ढोले** (१९६५) : विविध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतून विज्ञानकथा प्रसिद्ध. 'प्रतिशोध', 'प्रेमाचा रेणू', 'अश्मजीव', 'संकरित', 'अंतराळातील मृत्यू' हे विज्ञानकथासंग्रह प्रसिद्ध.

राजू हा खोडकर, पण जिज्ञासू वृत्तीचा मुलगा आहे. त्याला वेगवेगळ्या प्रकारचे दगडधोंडे गोळा करण्याची आवड आहे. एके दिवशी रात्रीच्या वेळी राजूला एक अनोखा दगड मिळतो. या अनोख्या दगडाबाबतची माहिती आपण या काल्पनिक विज्ञानकथेतून जाणून घेऊया.

राजू चौकस बुद्धीचा, जिज्ञासू मुलगा. सतत काहीना काही उद्योग करणारा. खूप प्रश्न विचारणारा. एक भागिले एक म्हणजे किती? शून्य भागिले एक म्हणजे किती? यात फरक काय? सूर्याचं तापमान किती? असे प्रश्न विचारून भंडावून सोडणारा हा राजू रस्त्यात त्याला काही नवीन वस्तू अथवा प्राणी दिसला म्हणजे तो त्यातच रमत असे.

आजही शाळेतून येताना नेहमीप्रमाणे राजूचे मित्र पुढे निघून गेले होते. संधिप्रकाश अंधूक होऊ लागला होता. राजू एक एक दगड उचलून बॉलिंग करावी तसा फेकत रस्त्याने चालला होता.



**तुम्हांला काय आवडते?**

- तुम्हांला कोणकोणत्या वस्तूंचा संग्रह करायला आवडतो?

अचानक एक गुळगुळीत दिसणारा, पण स्पर्शाला खरखरीत असा दगड राजूच्या हाती आला. त्यानं तो नेहमीप्रमाणे फेकला; पण तो घरंगळत न जाता उड्या मारत अपेक्षेपेक्षा खूपच अंतरावर जाऊन थांबला. गाडीला ब्रेक लागावा तसा. राजूला आश्चर्य वाटलं. तो थोडा वेळ थबकला. जास्त बल न लावता फेकलेला दगड एवढ्या लांबपर्यंत कसा गेला? त्यानं दुसरा धोंडा उचलला. खूप जोर लावून त्यानं तो फेकला; पण पूर्वीच्या फेकलेल्या गुळगुळीत धोंड्यापर्यंत न पोहोचलेला पाहून, राजू थोडा धास्तावला. त्याला काहीच कळत नव्हतं. हा अनुभव त्याला वेगळाच होता. काय करावं त्याला सुचत नव्हतं. कदाचित आपला हा भ्रम असू शकेल, म्हणून त्यानं तो धोंडा पुन्हा फेकण्याचं ठरवलं.

या वेळेस तो गुळगुळीत दिसणारा पण खरखरीत वाटणारा धोंडा त्यानं उचलून, पूर्वीपेक्षा खूपच कमी बलानं फेकला आणि चेंडू जसा उड्या मारत जातो, खोडकर मुलं जशी उड्या मारत पळतात, तसाच तो धोंडा पूर्वीपेक्षाही उंच उड्या मारत गेला व थांबला.

राजूला या नवीन धोंड्याची थोडी गंमत वाटली. एक नवीन खेळणंच आपल्या हाती लागल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. हा धोंडा काहीतरी विलक्षण असल्याची जाणीव त्याला झाली.

शाळा सुटून बराच वेळ झाला होता. अंधार दाटून आल्यानं हा खेळ राजूला थांबवावा लागला. तो विलक्षण धोंडा त्यानं उचलला. अजून काही वेगवेगळ्या

प्रकारचे दगड त्यानं गोळा केले होते. राजू घरी आला. घरी नेहमीप्रमाणेच त्याचं 'स्वागत' होणार होतं.

राजूचे वडील बाबा पाटील कडक शिस्तीचे आणि करारीही. घरी येताच बाबांचा करडा स्वर राजूच्या कानी पडला.

''राजूऽऽ कुठे होता इतक्या वेळपर्यंत?''

''शाळा सुटल्यानंतर मी खेळत होतो.''

''काय खेळत होतास? दगडधोंडे?'' बाबांचा वैतागलेला स्वर

''होऽऽ!'' राजूचा हुंकार

बाबांनी राजूच्या खिशातील सर्व दगडधोंडे काढून बाहेर भिरकावले. फेकलेल्या त्या गुळगुळीत धोंड्याकडे राजू आशाळभूत नजरेने पाहत राहिला. रात्र बरीच झाली होती, पण राजूला झोपच येत नव्हती. बाबांनी बाहेर फेकलेला तो गुळगुळीत धोंडाच त्याच्या डोळ्यांसमोर येत होता. आजूबाजूला पाहत तो बाहेर पडला. बाहेर किट्ट अंधार होता. तो धोंडा त्याला कुठे सापडणार होता? तरीदेखील बाबांनी जिथे ते सर्व दगडधोंडे भिरकावले होते, ती जागा त्याने शोधून काढली, पण तो धोंडा काही सापडेना. राजू कष्टानं



उठला. शेवटचा प्रयत्न म्हणून झुडपांमध्ये शोधण्याचा निर्णय त्यानं घेतला. तिकडे जात असतानाच, गर्द झुडपात राजूला काहीशी अंधूकशी चकाकी असलेला तो धोंडा दिसला.

'म्हणजे रात्रीच्या वेळी हा असा दिसतो तर?' कुठलीही भीती न बाळगता, राजूनं झुडपात हात घालून तो धोंडा काढला. दबक्या पावलानं घरात येऊन टेबलाचा ड्रॉवर हळूच उघडून, त्यानं सगळे दगडधोंडे एका कोपऱ्यात ठेवले.

सकाळी उठल्यावर राजूनं टेबलाचा संपूर्ण ड्रॉवर उघडला. धोंड्याबरोबर सोबत ठेवलेले इतर तीन-चार दगड त्याला सापडले नाहीत. राजूनं धोंड्याकडे निरखून पाहिलं. तो आकारानं त्याला काहीसा फुगीर भासला. उचलताच पूर्वीपेक्षा जडही जाणवला. हा आपल्याला भास होतोय की काय! राजूला कसलाच अर्थबोध होत नव्हता. तेवढ्यात आईच्या हाकेनं तो विचारशृंखलेतून बाहेर आला.

शाळेत जाताना राजूनं सर्वांची नजर चुकवत तो धोंडा हळूच आपल्या दप्तरात ठेवला. त्या धोंड्यामुळे राजूच्या मनात कुतूहल जागृत झालं होतं.

रात्री कुणालाही न दाखवता राजूनं तो धोंडा पुन्हा आधीच्याच ठिकाणी ड्रॉवरमध्ये ठेवला व फारसा कुणाशी न बोलताच झोपी गेला.

मध्यरात्री एखाद्या स्वप्नातून उठावं तसा तो गडबडून उठला. आई शेजारीच झोपली होती. त्यानं तिला हलवलं पण ती उठली नाही. राजूला आश्चर्य वाटलं. टाचणी पडल्याचा आवाज होताच उठणारी आई... एवढी गाढ कशी झोपली, याचंच त्याला आश्चर्य वाटत होतं. तेवढ्यात त्याचं लक्ष टेबलाकडे गेलं व तो चकित झाला. जिथे धोंडा ठेवला होता, त्या बंद ड्रॉवरच्या फटीमधून प्रखर प्रकाशकिरणं बाहेर येताना त्याला दिसली. एखाद्या चुंबकाकडे आकर्षित व्हावं तसा राजू टेबलाकडे ओढला गेला. नकळत त्यानं ड्रॉवर उघडला. उघडताच ती खोली प्रकाशानं झळकून गेली. धोंडा एखाद्या हिऱ्यासारखा चमकत होता. त्याच्यापासूनच विशिष्ट प्रकारच्या लहरी निघत होत्या.

त्या प्रखर प्रकाशातही आई व बाबा झोपलेले पाहून राजू गांगरला. कदाचित या धोंड्यामुळेच ते झोपले असावेत, असा तर्क त्यानं केला.



धोंड्यापासून निघणाऱ्या प्रकाशलहरी त्याच्या आईबाबांच्या व परिसरातील इतर सजीव प्राण्यांच्या मेंदूच्या लहरींशी जुळल्यानं ते गाढ झोपेतून उठणं शक्य नव्हतं; पण राजू स्वत: त्याचवेळेस स्वप्नसृष्टीत असल्यानं, धोंड्यापासून निघणाऱ्या लहरी त्याच्या मेंदूशी जुळू शकल्या नव्हत्या, म्हणूनच या महत्त्वाच्या क्षणी राजू जागा झाला होता.

हे सर्व राजूच्या आकलनापलीकडचं होतं.

प्रखर प्रकाश फेकणाऱ्या धोंड्याकडे राजू जास्त काळ पाहू शकला नाही. त्यानं आपली नजर दुसरीकडे वळवली. क्षणानंतर डोळे उघडून त्यानं लख्ख प्रकाशात पुन्हा त्या प्रकाशमय धोंड्याकडे पाहिलं. प्रकाशमय धोंड्याची हालचाल पाहून तो शहारला. धोंडा वेडावाकडा होऊ लागला. त्याच्यापासून दुसऱ्या एका लहान धोंड्याची निर्मिती पाहून तर राजू घाबरला. दगडापासून दगड? त्याला काहीच सुचत नव्हतं.

नुकत्याच जन्मलेल्या त्या लहान धोंड्याची हालचाल पाहून राजूला भीतिमिश्रित गंमत वाटली. छोट्या धोंड्याला स्पर्श करण्याचा मोह त्याला झाला; पण तो त्याने टाळला. दोन प्रकाशमय धोंडे त्याला आता स्पष्ट दिसत होते. धोंड्यांचा प्रकाश हळूहळू लुप्त होऊ लागला, तसा राजूच्या मेंदूवर झोपेचा अंमल चढू लागला.

सकाळी उठताच, रात्रीचा स्वप्नवत प्रसंग राजूला आठवला. तसाच वेगानं तो टेबलाकडे धावला. आत एक लहान व दुसरा मोठा धोंडा पाहून त्याचं हृदय धडधडलं. रात्री आपण जे काही पाहिलं ते खरंच असल्याची त्याची खात्री पटली. दोन्ही धोंडे त्यानं खिशात टाकले.

राजू शांतपणे आपली तयारी करून शाळेत निघून गेला. शाळेत येताच राजूनं शिक्षकांना, मित्रांना त्या धोंड्याविषयी सांगण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा हा नेहमीचाच विचित्रपणा असेल म्हणून त्यांनी टाळलं. तो निराश झाला. कुणीच ऐकत नाही म्हटल्यानंतर त्याची जास्तच घालमेल होऊ लागली. तो अस्वस्थ झाला.

त्याच दिवशी शाळेत विज्ञान मंडळातर्फे प्रसिद्ध विज्ञान कथाकार श्री. अनिल घोटे यांचं व्याख्यान होतं. त्यांनी अंतराळासोबतच परग्रहावरील जीवसृष्टीसंबंधीची कथा सांगितली. राजूनं त्यांची कथा बारकाईनं ऐकली. त्यानंतरचा राजूचा संपूर्ण दिवस अस्वस्थतेत गेला. त्यातच त्यानं एक ठाम निश्चय केला. राजूच्या ठाम निश्चयाला त्याच्या बाबांचाही पाठिंबा मिळाला. राजूच्या शाळेतील पाटीलसरांनी राजू व त्याच्या बाबांना प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. अनिल घोटे यांच्याकडे नेले.

त्यानंतर काही दिवसांनी डॉ. अनिल घोटे यांच्या समवेत त्यांचे शास्त्रज्ञ मित्र डॉ. कसबे व डॉ. पंडित हे

राजूच्या शाळेत आले. पाटीलसरांनी शाळेतील सर्व मुलांना पाहुण्यांची ओळख करून दिली. श्री. घोटे बोलू लागले, ''राजू अतिशय चलाख, चाणाक्ष व हुशार मुलगा आहे. कुठल्याही गोष्टीचा पाठपुरावा करण्याची त्याची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. कुतूहलापोटी जमवलेल्या धोंड्यांविषयी सांगण्यासाठी राजू सहा दिवसांपूर्वी त्याच्या बाबांबरोबर माझ्याकडे आला होता. त्याच्या हातात धोंडे पाहून मलाही प्रथम त्याच्याविषयी शंका आली; पण पुढे धोंड्याविषयीचा अनुभव त्याने माझ्याजवळ सांगितला. त्यानं मी शहारलो. त्याच रात्री आम्ही प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. कसबे व डॉ. पंडितांकडे गेलो.'' डॉ. घोटेंनी डॉक्टरद्वयींकडे कटाक्ष टाकला. 'पुढचा प्रसंग तुम्हीच सांगा,' असा निर्देश करत डॉ. घोटे थांबले.

डॉ. कसबे सांगू लागले, ''राजूनं सांगितलेल्या अनुभवानं आम्हीही चरकलो. आमच्या समोरच ते दोन धोंडे त्यानं ठेवले होते. त्याच रात्री आम्ही संशोधनाला सुरुवात केली. हा तुमचा छोटा राजूही आमच्या बरोबर होता. त्या धोंड्यांतून आम्हांला धक्कादायक माहिती मिळाली. हे धोंडे दूरवर असलेल्या परग्रहावरील सजीव प्राणी होते, आपल्यापेक्षा कित्येक पटीने बुद्धिमान असे. असेच धोंडे अमेरिकेच्या एका प्रांतात सापडल्याची नुकतीच बातमी आली आहे. या धोंड्यांमध्ये पृथ्वीवरील सजीवांबरोबरच निर्जीव वस्तूही गिळंकृत करण्याची क्षमता होती. अगदी दगडंसुद्धा. त्यानंच त्यांचा उदरनिर्वाह होत होता. पर्यायानं प्रजननक्षमता वाढून त्याच्यापासून दुसऱ्या धोंड्यांची निर्मिती होऊ लागली होती. राजूनं हे शोधलं नसतं, तर काही वर्षांतच मानवाचं उच्चाटन झाल्याखेरीज राहिलं नसतं. त्यासाठीच धोंड्यांचा नायनाट करणं आवश्यक होतं. त्यात आम्ही यशस्वीही झालो. या सर्वांचं श्रेय राजूलाच आहे. त्याच्यामुळेच पृथ्वीवरील अरिष्ट टळलेलं आहे.''

***

## स्वाध्याय



**प्र. १. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) **राजूची गुणवैशिष्ट्ये**

(आ) **राजूला सापडलेल्या धोंड्याची वैशिष्ट्ये**

(इ) **शास्त्रज्ञ डॉ. पंडितांनी धोंड्याबद्दल सांगितलेली माहिती**

**प्र. २. हे केव्हा घडले ते लिहा.**

(अ) राजूला नवीन धोंड्याची गंमत वाटली.

(आ) प्रखर प्रकाशातही राजूचे आईबाबा झोपले होते.

(इ) राजूच्या मेंदूवर झोपेचा अंमल चढू लागला.

प्र. ३. राजूला चकाकणारा दगड सापडल्यानंतर राजूची झालेली मन:स्थिती, याबाबतचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

प्र. ४. राजूला दगड सापडल्यापासून त्याला शास्त्रज्ञ भेटेपर्यंत घडलेल्या गोष्टी क्रमाने लिहा.

प्र. ५. चौकसपणा व जिज्ञासूवृत्ती हे गुण तुम्हांला महत्त्वाचे वाटतात का? का ते सांगा.

## खेळूया शब्दांशी.

- कंसातील शब्द योग्य ठिकाणी वापरून रिकाम्या जागा पूर्ण करा.


(करडा, विचारशृंखला, अस्वस्थता, घालमेल)

(अ) लेखकांची...................... तुटल्यामुळे त्यांना खूप राग आला.

(आ) शिक्षकांचा ...................... कटाक्ष बघून विद्यार्थी एकदम शांत बसले.

(इ) वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर होताना संजयच्या मनात प्रचंड .................. होत होती.

(ई) रामरावांची ..................... बघून त्यांना ताबडतोब दवाखान्यात भरती केले.



## खेळ खेळूया.

- खाली दिलेल्या चौकटींत म्हणी लपलेल्या आहेत, त्या ओळखा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | णा | श | त्या |
| का | ति | चा | ल |
| हा | मा | बै | रि |

______________________

| | | | |
|---|---|---|---|
| ए | भा | ना | ध |
| रा | क | ड | ध्या |
| भ | चिं | र | |

______________________

| | | | |
|---|---|---|---|
| ऐ | ज | चे | क |
| ना | का | वे | ना |
| म | रा | वे | चे |

______________________



## लिहिते होऊया.

- राजूला ज्याप्रमाणे अनोखा धोंडा सापडला, त्याप्रमाणे तुम्हांला कधी वेगळ्या वस्तू सापडल्या का? त्या कोणत्या?
- विद्यार्थ्यांनो, तुम्हांला आवडलेल्या राजूच्या कथेचा शेवटचा भाग हा काल्पनिक विज्ञानकथेचा भाग आहे. या पाठाचा शेवट बदलून वेगळ्या प्रकारे कथा पूर्ण करण्याचा तुम्ही प्रयत्न करा.
- दोन शास्त्रज्ञ व राजू यांच्यात काय बोलणे झाले असेल, ते संवादरूपाने लिहा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

पाऊण, पाऊस, खरीप, बहीण, जमीन, मूल, रूळ, फूल, कठीण, देऊन, चूल, गरीब, सामाईक, माणूस.

वरील प्रत्येक शब्दातील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवले?

या प्रत्येक शब्दामधील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार नाहीत आणि शेवटून दुसऱ्या (उपान्त्य) अक्षरांतील इकार, उकार दीर्घ आहेत.

**जेव्हा मराठी शब्दांतील शेवटच्या अक्षरात काना, मात्रा, वेलांटी, उकार दर्शवलेले नसतात, तेव्हा शेवटून दुसऱ्या अक्षरांतील इकार, उकार दीर्घ लिहितात.**

वर दिलेल्या वर्णनानुसार किमान दहा शब्द लिहा.

**लक्षात ठेवा : तत्सम शब्दांतील शेवटून दुसऱ्या (उपान्त्य) अक्षरांतील इकार व उकार संस्कृतमधील मूळ शब्दांप्रमाणेच ऱ्हस्व लिहितात.**

उदा., नूपुर, चतुर, मानसिक, गुण, मंदिर, कुसुम, तरुण, प्रिय.

- **खालील चित्रांची नावे लिहा.**














### सुविचार

- **पुस्तकांच्या वाचनातून आपल्याला एकांतात विचार करण्याची सवय लागते आणि त्यातूनच खरा आनंद मिळतो. – डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**
- **काहीतरी करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीला या जगात अशक्य काहीच नाही. – अब्राहम लिंकन**
- **कष्ट आणि सेवा यांतच खरा आनंद आहे. दुसऱ्यांसाठी झटणाऱ्यांना खरा आनंद अनुभवता येतो. – सुभाषचंद्र बोस**

# मल्लखांब



साधा मल्लखांब

मल्लखांब हा वैशिष्ट्यपूर्ण असा महाराष्ट्रीय व्यायाम प्रकार आहे. कुस्तीमध्ये प्रावीण्य मिळवण्याच्या उद्देशाने मल्ल विशिष्ट लाकडी खांबावर अनेक कसरतीचे प्रकार करत असल्याने त्यास हे नाव पडले.

बाळंभटदादा देवधर हे मल्लखांबाचे जनक होत. कुस्तीगिराच्या अंगी ताकद, चपळता, लवचीकपणा, डावपेचात्मक सफाई इत्यादी गुणांच्या वाढीबरोबरच त्याचा दमही वाढावा, या उद्देशाने बाळंभटदादा देवधर यांनी मल्लखांबावरील निरनिराळे कसरतींचे व उड्यांचे प्रकार तयार केले.

मल्लखांबाचे आकार व प्रकार अनेक आहेत; पण सर्वसामान्यपणे प्रचलित असलेला साधा मल्लखांब हा २ ते २$\frac{१}{२}$ मीटर उंचीचा, शिसवी अथवा सागवानी लाकडाचा, वरच्या दिशेने निमुळता होत जाणारा असतो. अंग, मान व बोंड असे त्याचे तीन भाग असतात.

(१) **अंग–** मल्लखांबाच्या बुंध्यापासून मानेपर्यंतच्या निमुळत्या होत जाणाऱ्या भागास 'अंग' असे म्हणतात.

(२) **मान–** मल्लखांबाच्या अंगाच्या वर जो बारीक निमुळता नसलेला सरळ भाग असतो, त्याला 'मान' असे म्हणतात.

(३) **बोंड–** मल्लखांबाच्या सर्वांत वरच्या गोलाकृती भागास 'बोंड' असे म्हणतात.

**पूर्वीच्या मल्लखांबाचे प्रकार**

(१) वेताचा मल्लखांब
(२) हल्यारी मल्लखांब
(३) पलित्याचा मल्लखांब
(४) उसाचा मल्लखांब

**आताच्या मल्लखांबाचे प्रकार**

(१) पुरलेला मल्लखांब
(२) टांगता मल्लखांब
(३) दोरीचा मल्लखांब

मल्लखांबावरील कौशल्यांचे सोळा प्रकारांत वर्गीकरण केले आहे.

(१) अढी (२) तेढी (३) बगली (४) दसरंग (५) फिरकी (६) सुईदोरा (७) वेल (८) उतरती (९) झाप (१०) फरारे (११) आसने (१२) आरोहण-उड्या (१३) उड्या (१४) ताजवे (१५) सलाम्या (१६) चमत्कृतिजन्य कामे.

कुस्तीच्या कामी मल्लखांबाचा उपयोग कसा व किती होतो याचा अंदाज तुम्हांला आलाच असेल; पण त्याशिवाय नुसता व्यायामाचा प्रकार म्हणून देखील मल्लखांब फार वरच्या दर्जाचा मानला जातो. या व्यायामापासून आरोग्याचा चांगला लाभ होतो. यातील कौशल्ये करताना निरनिराळ्या प्रकारे शरीर वाकवून करायची असल्याने शरीराच्या आतील इंद्रियांच्या क्रिया सुधारतात. शरीराच्या सर्व भागांतील स्नायूंना उत्तम प्रकारे ताण पडून ते मजबूत होतात. या कौशल्यांमुळे शरीर लवचीक राहते. या शारीरिक कौशल्यांत पुष्कळ वेळा, खाली डोके वर पाय अशा स्थितीत राहावे लागते, त्यामुळे रक्ताभिसरणाचे कार्य सुधारते व आरोग्य चांगले राहते. थोडक्यात, आपल्या असे लक्षात येते, की शरीरातील विविध क्षमता विकसित करण्यासाठी मल्लखांब उपयुक्त आहे.

- तुम्हांला कोणता न कोणता तरी खेळ खेळायला नक्कीच आवडत असेल. खाली काही मुद्दे दिले आहेत. त्या आधारे तुमचे विचार लिहा.

तुमचा आवडता खेळ

येथे खेळाचे चित्र लावा.

१ हा कोणत्या प्रकारचा खेळ आहे? (वैयक्तिक/सांघिक)

२ हा कोणत्या स्वरूपाचा क्रीडा प्रकार आहे? (शारीरिक/बौद्धिक)

३ हाच खेळ तुम्हांला का आवडतो?

४ या खेळामध्ये किती खेळाडू असतात?

५ या खेळामुळे कोणते फायदे होतात?

६ या खेळात विजयी होण्यासाठी काय आवश्यक आहे?

७ या खेळामधील तुमचे प्रेरणास्थान कोण आहे?

## आपण समजून घेऊया.

कोणत्याही भाषेत सुरुवातीला खूप सारे शब्द नसतात. जसजशी ती भाषा अनेक भागांत वापरली जाते तसतशी त्या भाषेतील शब्दसंख्या वाढू लागते. वेगवेगळ्या भाषांतील शब्द आपल्या भाषेत मिसळतात व ते इतके रूढ होतात, की हा शब्द आपल्या भाषेतील नाही, असे आपल्याला मुळीच वाटत नाही. कधी कधी आपण इतर भाषांतील शब्द आपल्या भाषेत जसेच्या तसे घेतो, तर कधी कधी शब्दांच्या मूळ रूपांत बदल करतो.

शब्द कसा बनतो म्हणजे सिद्ध होतो, यास **शब्दसिद्धी** म्हणतात. आपल्या मराठी भाषेत अनेक भाषांतून आलेले शब्द समाविष्ट आहेत. मराठी भाषेची शब्दसंपत्ती विपुल आहे. त्यांत प्रामुख्याने तत्सम, तद्भव, देशी व परभाषीय अशा चार प्रमुख प्रकारांतील शब्द आहेत.

### (१) तत्सम शब्द

संस्कृत भाषेतील अनेक शब्द जसेच्या तसे म्हणजे त्यांच्या रूपांत काही बदल न होता मराठी भाषेत आले आहेत. असे शब्द म्हणजे **तत्सम शब्द** होय.

उदा., कन्या, पुत्र, पिता, पुष्प, जल, भगवान, भूगोल, परंतु.

### (२) तद्भव शब्द

संस्कृत भाषेतील अनेक शब्द जसेच्या तसे न येता, त्यांच्या रूपांत काही बदल होऊन मराठी भाषेत आले आहेत. असे शब्द म्हणजे **तद्भव शब्द** होय.

उदा., गाव (ग्राम), दूध (दुग्ध), हात (हस्त), कान (कर्ण), पान (पर्ण), कोवळा (कोमल).

### (३) देशी शब्द

जे शब्द अन्य भाषांतून आलेले नाहीत, अशा मूळ शब्दांना **देशी शब्द** म्हटले जाते.

उदा., चिमणी, वांगे, झोप, डोळे, दगड, झाड, हाड, बाजरी, गुडघा.


### (४) परभाषीय शब्द

जसे संस्कृतमधील शब्द आपल्या मराठी भाषेत आढळतात, तसेच संस्कृतशिवाय इतर भाषांतील शब्ददेखील मराठीत समाविष्ट झालेले आहेत. असे शब्द म्हणजे **परभाषीय शब्द** होय.

- कानडी, इंग्रजी, तेलुगू, पोर्तुगीज, फारसी, अरबी, हिंदी, गुजराती अशा भाषांतून आलेल्या शब्दांची काही उदाहरणे पाहूया.

| हिंदी | कानडी | इंग्रजी | पोर्तुगीज | फारसी | अरबी | तेलुगू | गुजराती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दाम | भाकरी | बॅट | पगार | पेशवा | खर्च | अनारसा | डबा |
| करोड | गुढी | पेन | बटाटा | कारभार | मेहनत | चेंडू | दादर |
| मिठाई | विळी | टेबल | मेज | सरकार | इनाम | | शेट |
| सडक | गाजर | फी | पेरू | सामना | करार | | घी |
| भाई | ताई | डॉक्टर | चावी | दरबार | अर्ज | | रिकामटेकडा |
| | अडकित्ता | बस | | | कर्ज | | |
| | | फाइल | | | | | |

# २०. विचारधन



**महर्षी धोंडो केशव कर्वे :** हे 'अण्णासाहेब कर्वे' म्हणून ओळखले जात. समाजसुधारणेच्या कामात ते हिरिरीने भाग घेत. हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ या संस्था त्यांच्या प्रयत्नांनी नावारूपाला आल्या. त्यांनी केलेल्या समाजसेवेच्या गौरवार्थ आपल्या भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा किताब दिला.

**त्यांचे विचार–** 'विद्यार्थी व विद्यार्थिनी हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. त्यांनी दोन गोष्टी सतत ध्यानी बाळगाव्या.

(१) गतानुगतिक वृत्ती टाकून स्वतंत्र विचार करायला त्यांनी शिकावे, मात्र हे लक्षात ठेवले पाहिजे, की आपल्याला स्वतंत्र विचार करण्याचा जसा हक्क आहे तसाच तो इतरांनाही आहे.

(२) मनाचा समतोलपणा राखावा.

केव्हाही मनाचा समतोल ढळता कामा नये. हा तोल सावरणे ही कठीण गोष्ट आहे. हा तोल सांभाळला नाही, म्हणूनच जगात मोठमोठे अनर्थ घडून आलेले आहेत. मनाचा समतोल सांभाळून व भावनांच्या आहारी न जाता, आपल्याला पटलेली गोष्ट धैर्याने आचरणात आणणारी माणसेच आपले हे स्वराज्य टिकवू शकतील.

समतेचे तत्त्व आचरणात आणणारी व भेदाभेद न मानणारी माणसे मोठ्या प्रमाणात झाल्याशिवाय या देशाचा उद्धार होणार नाही, अशी माझी ठाम खात्री आहे.'



**नामदार गोपाळ कृष्ण गोखले :** हे लोकमान्य टिळकांचे समकालीन. उदारमतवादी म्हणून ते प्रसिद्ध होते. विधायक कार्य करणाऱ्या अनेक संस्थांना त्यांनी चालना दिली. त्यांनी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली. 'भारत सेवक समाज' या नावाने आता ती परिचित आहे. गोपाळ कृष्ण गोखले यांना महात्मा गांधी गुरुस्थानी मानत.

**त्यांचे विचार–** 'आज सर्वांत अधिक गरज असेल, तर ती देशाच्या चारी कोपऱ्यांत ऐक्याची नि देशभक्तीची शिकवण देणाऱ्या कार्यकर्त्यांची. देशप्रेम इतके पराकोटीला पोचायला हवे, की केवढाही त्याग करायला लागो तो आनंददायी वाटला पाहिजे. आज त्यागाची अधिक जरूर आहे. बोलणे नको, काम हवे! आपण सारे भाऊ भाऊ आहोत. आपण सारे हिंदी आहोत. धर्म आणि पंथ यांत गुरफटून जाऊ नका. समाजाची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी राष्ट्रीय चारित्र्यही हवे. आज नैतिक सामर्थ्य कमी होत आहे. संकुचित भावना आणि क्षुद्र विचार यांची मगरमिठी न सोडवू तर भाग्योदय कसा होणार? आपल्या सर्व कामांत शिस्त, स्वार्थत्याग व कुशलता हे गुण प्रामुख्याने हवेत.

राष्ट्राची उभारणी हे सोपे काम नाही. त्यासाठी सबंध आयुष्य द्यावे लागते. आपण खत होऊया, भावी पिढी पीक घेईल.'

# २१. संतवाणी

• ऐका. वाचा. म्हणा.

**पंढरी नगरी दैवत श्रीहरी । जाती वारकरी व्रतनेमें ।।१।।**
**आषाढी कार्तिकी महापर्वे थोर । भजनाचा गजर करिती तेथें ।।२।।**
**साधुसंत थोर पताकांचा भार । मुखीं तो उच्चार नामामृत ।।३।।**
**आनंदाचा काला गोपाळकाला केला । हृदयीं बिंबला नरहरी ।।४।।**

**– संत नरहरी सोनार**

**संत नरहरी सोनार** – संत नरहरी सोनार हे महाराष्ट्रातील थोर संत कवी होत. प्रस्तुत अभंगात आषाढी-कार्तिकी वारी करून पंढरपूरला विठुमाउलीच्या दर्शनाला नित्यनेमाने जाणाऱ्या वारकऱ्यांचे वर्णन केले आहे.

**माझें माहेर पंढरी । सुखें नांदु भीमातीरीं ।।१।।**
**येथें आहे माय बाप । हरे ताप दरुशनें ।।२।।**
**निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरींची ।।३।।**
**कैशी विटेवरी शोभली । पाहुनि कान्होपात्रा धाली ।।४।।**

**– संत कान्होपात्रा**

**संत कान्होपात्रा** – संत कान्होपात्रा या महाराष्ट्रातील थोर संत कवयित्री.

प्रस्तुत अभंगात कान्होपात्रा म्हणतात, की 'माझे माहेर पंढरपूर आहे. तिथे भीमा नदीच्या तीरावर सुख, आनंद आहे. पांडुरंग हे माझे आईवडील आहेत. विटेवर उभ्या असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनाने माझ्या मनातील चिंता, व्यथा, तळमळ दूर होते.'

# शब्दार्थ

पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता व बोली यांमध्ये आलेले कठीण शब्द, वाक्प्रचार व त्यांचे अर्थ येथे दिलेले आहेत. दिलेले शब्द व वाक्प्रचार यांची मांडणी विद्यार्थ्यांनी वहीत शब्दकोशाप्रमाणे करावी.

◆ **जय जय महाराष्ट्र माझा (गीत)**

**तट्टू** – लहान घोडा. **जबाब** – उत्तर. **निढळ** – कपाळ, ललाट. **तक्त** – तख्त, सिंहासन.

◆ **स्वप्नं विकणारा माणूस**

**तुच्छ लेखणे** – तिरस्कार करणे, कमी लेखणे. **कुतूहल** – उत्सुकता. **ऐट**– तोरा, मिजास. **गराडा पडणे** – गर्दी होणे. **दिलखेच** – मनाला आकर्षित करणारे. **मती कुंठित होणे** – विचारप्रक्रिया थांबणे. **संभ्रमात पडणे** – गोंधळात पडणे. **तल्लीन होणे** – मग्न होणे. **तरतरी पेरणे** – उत्साह निर्माण करणे. **भरभरून बोलणे** – तोंडभरून बोलणे. **ढब** – शैली. **गहिवरून येणे** – कंठ दाटून येणे.

◆ **तोडणी**

**मनात काहूर उठणे** – कावरेबावरे होणे. **पाचूंदा** – कडब्याचा पाच पेंढ्यांचा गट. **सरमड** – बाजरीचे ताट, कडबा. **तांबडं फुटणे** – सकाळ होणे. **काकडून निघणे** – थंडीने गारठणे. **पाचट** – उसाचा वाळलेला पाला, चिपाड. **हबकून जाणे** – धक्का बसणे. **उलघाल होणे** – अस्वस्थ, बेचैन होणे. **आबाळ होणे** – हेळसांड होणे. **पैकं** – पैसे. **आनंदाला पारावार न उरणे** – खूप आनंद होणे.

◉ **भाषेचा नमुना**

**अहिराणी बोली**

**नही** – नाही. **सिकेल** – शिकलेला. **टाप** – हिंमत. **पाळी** – वेळ. **घरना** – घरचा **गावनाभी** – गावचा. **भायेरल्याज** – बाहेरच्या. **उट्यारेट्या** – चौकश्या. **बांधवरथून** – बांधावरून. **कज्या** – भांडणे. **मिटाडाले** – मिटवायला. **रातलेभी** – रात्रीसुद्धा. **याळम्हान कव्हळज** – दिवसभरात कधीही. **आत्तेज** – आत्ताच. **धुयेल** – धुतलेले. **धुवळाफूल** – पांढरेशुभ्र. **टार्च** – कडक. **बसीसन** – बसून. **फोपाटा** – धूळ.

◆ **श्रावणमास (कविता)**

**हर्ष** – आनंद. **मानसी**– मनाला, मनास. **शिरवे** –पावसाच्या सरी. **नभोमंडपी** – आकाशरूपी

मंडपात. **जलद** – मेघ. **बलाकमाला** – उडणाऱ्या बगळ्यांची रांग. **अवनी** – पृथ्वी. **पावा** – बासरी. **गाय** – गात. **सुवर्णचंपक** – सोनचाफा. **विपिनी** – अरण्यात, वनात. **भामा** – सत्यभामा, श्रीकृष्णाची पत्नी. **रोष** – राग. **पुरोपकंठी** – नगराजवळील बागेत. **ललना** – स्त्रिया.

### ◆ भांड्यांच्या दुनियेत

**कोठीची खोली** – धान्य साठवण्याची खोली. **नित्योपयोगी** – नेहमी उपयोगात असणारी. **काठवट** – पीठ मळण्यासाठी वापरली जाणारी लाकडी परात. **प्रगल्भ** – परिपक्व.

### ◆ थोरांची ओळख – डॉ. खानखोजे

**खलबत** – गुप्त चर्चा. **पर्वणी** – दुर्मिळ संधी.

### ◆ माझी मराठी (कविता)

**ऋण** – उपकार. **उतराई होणे** – ऋणातून मुक्त होणे. **लोहापरी** – लोखंडाप्रमाणे. **गंध** – सुवास. **अमृत** – सुधारस. **प्राशन करणे** – पिणे. **वर्णावी** – वर्णन करावी.

### ◆ गचकअंधारी

**पंचक्रोशी** – चार-पाच कोसांच्या आतील गावे. **मेटाकुटीला येणे** – रडकुंडीला येणे. **गिल्ला करणे** – गोंधळ करणे. **झुंजूमुंजू** – पहाटेचा संधिप्रकाश. **वक्ती** – वेळेस. **कोला** – कोल्हा. **पुळे** – पुढे. **भेव** – भीती. **युक्ती फळाला येणे** – यशस्वी होणे. **हिव भरणे** – थंडीने गारठून जाणे. **प्रभा फाकणे** – सकाळ, सूर्योदय होणे. **शंकेची पाल चुकचुकणे** – शंका निर्माण होणे. **करुणा भाकणे** – दयेची याचना करणे. **दरदरून घाम फुटणे** – खूप भीती वाटणे. **जिवात जीव येणे** – निश्चिंत होणे. **सुसाट पळत सुटणे** – वेगाने पळत सुटणे.

### ◆ नात्याबाहेरचं नातं

**झंकार** – मंजूळ नादयुक्त आवाज. **आगेकूच** – वाटचाल. **हुडहुडी** – थंडी, गारवा. **भास होणे** – समज होणे. **नखशिखान्त** – पायाच्या नखांपासून डोक्यापर्यंत. **न्याहाळणे** – एकाग्रतेने, बारकाईने पाहणे. **कणव निर्माण होणे** – दया निर्माण होणे. **भुरळ घालणे** – आकर्षित करणे. **काळजात धस्स होणे** – भीतीने धक्का बसणे.

### ◆ गोमू माहेरला जाते (गीत)

**नाखवा** – मुख्य नावाडी. **घोव** – पती, नवरा. **खाडी** – नदीत समुद्राचे पाणी जेथवर येते तो भाग. **ताटवा** – फुलझाडांचा मांडव, वाफा. **शहाळी** – कोवळे नारळ. **मापवणे** – मोजणे. **झणी** – लवकर. **गलबत** – होडी, नौका.

### ⦿ भाषेचा नमुना

#### कुपारी बोली (कोकणी)

**यासॉ** – येत असे. **उगडलॉ** – उघडला. **वाशीली** – वाचली. **जकल्या** – सगळ्या. **मरॅशे** – मरणार आहोत. **बग्यादो** – बघण्यासाठी. **वेळूस** – वेळ. **नॉतो** – नव्हता. **आटपॉन** – आटपून. **खाट्येऑर** – खाटेवर. **आयकॉ**– ऐकायला. **भॉठो** – मोठा. **खांबोरसॉ** – खांबावरील. **बारझाड** – झाडताना. **घरोर** – घरावर. **टुकीलॉ** – पाहिला.

### ◆ बाली बेट

**कंठा** – गळ्यातील सोन्या-मोत्यांचा हार. **कंठमणी** – गळ्यातल्या हारातील सर्वांत मोठे रत्न. **उभयता** – दोघे. **राई** – बन. **परिसमाप्ती** – शेवट. **अश्राप** – सभ्य, गरीब. **मिस्कीलपणे** – खट्याळपणे. **भाट** – स्तुती गाणारे, स्तुतिपाठक.

### ◆ सलाम-नमस्ते !

**दुर्मिळ** – मिळण्यास कठीण. **मन हेलावणे** – दु:ख वाटणे. **बावरणे** – गोंधळून जाणे. **थक्क होणे** – आश्चर्यचकित होणे. **पचनी पडणे** – मानवणे, आत्मसात होणे.

### ◆ अनाम वीरा... (कविता)

**अनाम वीर** – अज्ञात सैनिक. **जीवनान्त** – जीवनाचा शेवट. **समर** – युद्ध, लढाई. **देशाकाशीं** – देशासाठी. **विलीन होणे** – सामावून जाणे. **रियासत** – वतन. **तुशें** – तुझे. **मृत्युंजय** – मृत्यूवर विजय मिळवणारा.

### ◆ कवितेची ओळख

**काव्यप्रतिभा** – काव्यनिर्मितीची शक्ती. **प्रकल्प** – विशिष्ट कालावधीसाठी करण्यास दिलेले काम. **सांजवात** – संध्याकाळच्या वेळी लावलेला दिवा. **पाश सोडणे** – बंधनातून मुक्त होणे. **हेका धरणे** – हट्ट करणे. **भावनांचे मोहोळ चेतवणे** – भावना जागृत करणे.

## ◆ असे जगावे (कविता)

**नजर रोखणे** – निर्भयपणे पाहणे. **गुलामी** – दास्यत्व. **दांडगी इच्छा** – प्रबळ इच्छा. **कवेत अंबर घेणे** – अशक्य गोष्ट शक्य करणे. **काळीज काढून देणे** – प्रिय गोष्ट दुसऱ्याला देणे. **ठणकावून सांगणे** – न घाबरता सांगणे. **कठोर** – दयाशून्य, निष्ठुर.

## ◆ कोळीण

**सुगावा लागणे** – शोध लागणे. **कमान** – अर्धवर्तुळाकार. **गुंग होणे** – मग्न होणे. **गूढ** – रहस्य. **दबा धरणे** – हल्ला करण्यासाठी लपून बसणे. **प्रतीक्षा करणे** – वाट पाहणे. **असहाय** – हतबल. **पारध होणे** – शिकार होणे. **सोबग** – एक प्रकारचा कीटक. **उत्कंठा** – उत्सुकता. **तटस्थ** – उदासीन. **मागमूस नसणे** – माहीत नसणे. **अकस्मात** – अचानक. **प्रतवारी** – वर्गवारी.

## ◆ थेंब आज हा पाण्याचा (कविता)

**मोल** – मूल्य. **कोती** – संकुचित वृत्तीचे. **चाळा** – नाद, सवय. **ठगणे** – फसवले जाणे.

## ◆ वदनी कवळ घेता...

**रेलचेल** – समृद्धी, विपुलता. **अपव्यय** – वाया घालवणे. **नासाडी** – नासधूस. **यजमान** – पाहुणे. **अवाजवी** – आवश्यकतेपेक्षा जास्त. **दिलासा मिळणे** – आधार मिळणे.

## ◆ धोंडा

**भंडावून सोडणे** – हैराण करणे. **धास्तावणे** – घाबरणे. **भिरकावणे** – फेकणे. **लुप्त होणे** – गायब होणे. **पाठपुरावा करणे** – मागोवा घेणे. **अरिष्ट** – संकट.

## ◆ विचारधन

**हिरिरीने भाग घेणे** – उत्साहाने भाग घेणे. **नावारूपाला येणे** – लौकिक प्राप्त होणे. **समकालीन** – समान काळातील.

## ◆ संतवाणी

**व्रतनेमें** – नित्यनेमाने. **बिंबणे** – ठसणे. **निवारणे** – दूर करणे. **व्यथा** – दुःख. **धाली** – संतुष्ट झाली.

***




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ७ वी (मराठी)

₹ ४६.००